माहिती व्हावी या दृष्टीने सन १९९९-२००० करिता विस्तृत स्वरूपाची तयार केलेली कृषि कर्ज धोरण पुस्तिका प्रकाशित करावयाची आहे.

विषयावर चर्चा करतांना श्री धामेकि संचालक म्हणाले की, कृषि कर्ज विषयक धोरण पुस्तीकेत कुक्कुटपालन युनिट दर समाविष्ट करण्यांत यावे. सदर सुचना मान्य करण्यांत आली. विषयावर सविस्तर चर्चा करतांना कृषि कर्ज धोरण पुस्तीकेत पीक विमा, दिर्घ मुदती प्रोजेक्ट फायनान्सींग, लिफ्ट इरिगेशन, पोल्ट्री फार्म, डेअरी फार्म, फिशरी फार्म व इतरही प्रोजेक्टला कर्ज पुरवठा करण्याबाबतच्या अटी, शर्तीचा समावेश करण्यांत यावा. सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सुचना सभेत मान्य करण्यांत येवून सन १९९९-२००० करिता तयार करण्यांत आलेली कृषि धोरण पुस्तीका प्रकाशित करण्यास मान्यता देण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ६ - श्री. एस. एस. गोडे मुख्याधिकारी (प्रशासन) यांची प्रभारी व्यवस्थापक म्हणून तात्पुरती नेमणूक करणे व त्यांना पोटनियमानुसार अधिकार प्रदान करण्याबाबत दि ५.४.१९९९ चे सर्क्युलर मिटिंगमध्ये पारीत केलेला ठराव कायम करणे.

ठराव क्रमांक ६ - मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेत व्यवस्थापकाचे पद रिक्त आहे व ज्यावेळी सरव्यवस्थापक रजेवर असतात त्यावेळी कार्यालयीन कामांत खोळंबा निर्माण होतो. म्हणून सरव्यवस्थापकाचे अनुपस्थितीत बँकेचे कामकाज सुरळीत चालविण्याकरिता व्यवस्थापकाची अत्यंत आवश्यकता असल्याने बँकेचे मुख्याधिकारी (प्रशासन) यांची प्रभारी व्यवस्थापक म्हणून तात्पुरती नियुक्ती करण्याबाबत व त्यांना बँकेच्या पोटनियमानुसार अधिकार देण्याबाबत दि. ५.४.१९९९ रोजी सर्क्युलर मिटींग घेऊन ठराव पारीत केलेला आहे. व त्याप्रमाणे प्रभारी व्यवस्थापक म्हणून श्री. एस. एस. गोडे यांची तात्पुरती नियुक्ती केली आहे. विषयाचे अनुषंगाने चर्चा होऊन दि. ५.४.१९९९ रोजी खालीलप्रमाणे मंजूर करण्यांत आलेला सर्क्युलर मिटिंगचा ठराव सर्वानुमते कायम करण्यांत आला.

— ठराव —

बँकेचे व्यवस्थापक श्री. एम. एन. मानापूरे हे दिनांक — ३१.५.१९९८ रोजी बँकेतून निवृत्त झाले तेव्हापासून बँकेत व्यवस्थापकाचे

पद रिक्त आहे. यापूर्वी राज्य बँकेचे अधिकारी श्री. ए.डी. बेनोडेकर यांना विशेष कार्यासन अधिकारी म्हणून परसेवेवर घेण्यांत आले होते व त्यांना बँकेच्या पोटनियमानुसार व्यवस्थापकास असलेले अधिकार प्रदान करण्यांत आले होते. तथापी त्यांनी प्रकृती अस्वास्थ्यामुळे बँकेच्या सेवेतून मुक्त करण्याबाबत बँकेकडे विनंती केल्यामुळे त्यांना दिनांक २.६.१९९८ रोजी परसेवेतून मुक्त करण्यांत आले.

दिनांक ५.५.१९९८ रोजी झालेल्या मा. संचालक मंडळाचे सभेतील ठराव क्र.११(१९) नुसार बँकेत रिक्त असलेल्या व्यवस्थापकाचे जागेवर योग्य, कार्यकुशल व अनुभवी अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याचे अधिकार मा. अध्यक्ष यांना देण्यांत आले होते. तथापी अद्यापही व्यवस्थापकाचे पद रिक्त आहे.

बँकेचे कामकाज सुरळीतपणे चालविण्याकरिता व्यवस्थापकाची अत्यंत आवश्यकता असल्याने व सरव्यवस्थापकांवर कामाचा व्याप वाढल्याने या पदावर नियुक्ती होईपावेतो श्री. एस. एस. गोडे, मुख्याधिकारी (प्रशासन) यांची प्रभारी व्यवस्थापक म्हणून तात्पुरती नियुक्ती करण्यांत येत आहे. त्यांचेकडे सध्याचे पदाव्यतिरिक्त व्यवस्थापक पदाच्या अतिरिक्त पदभार राहिल व याबाबत त्यांना बँकेच्या नियमाप्रमाणे २०% विशेष भत्ता देण्यांत येईल. तसेच त्यांना आदेशाचे तारखेपासून बँकेच्या पोटनियमानुसार व्यवस्थापकांना असलेले प्रशासकीय व आर्थिक अधिकार प्रदान करण्यांत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक-१० - शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा अधिक सुलभतेने व तत्परतेने होण्याकरिता किसान कर्ज योजना राबविणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक १० - मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले आणि विषयाचे अनुषंगाने सभेला माहिती देतांना सांगितले की, शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा अधिक सुलभतेने व तत्परतेने व्हावा यासाठी शासनाने शासन निर्णय क्रमांक डीसीबी/१२९४/प्र.क्र.३९/२स दिनांक १३ जुलै १९९४ व १० मे १९९५ नुसार ऊस, कापूस, तेलबिया व फलोत्पादन अशा नगदीच्या पीकासाठी सुरु करण्यांत आलेली कृषि पत योजना राबवितांना व प्रत्यक्ष अंमलबजावणी करतांना अडचणी निर्माण झाल्यामुळे व सभासदांचा योग्य असा प्रतिसाद मिळाला नसल्यामुळे कृषि पत योजना राबविता आली नाही.

या योजनेतील उणिवा दुर करून शेतकऱ्यांसाठी किसान कार्ड योजना राबविण्याकरिता शासनाने शासन निर्णय क्रमांक-डिसीबी/१२९८/प्र.क्र.२३५/२स, दिनांक २०.२.९९ नुसार रुपये ५०००/- व त्यापेक्षा जास्त कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांसाठी राबविण्याबाबतचे निर्देश दिले आहेत. ज्या सभासदांची मागील

३ वर्षातील कर्ज उचल व कर्ज परतफेड नियमीत असेल आणि त्यांचे कर्ज व्यवहार समाधानकारक असतील अशा सभासदांना तज्ञ समितीने शिफारस केलेल्या दराप्रमाणे मर्यादा निश्चित करून निवड केलेल्या प्रत्येक सभासदाला हे कार्ड देण्यांत येईल. ह्या कार्डची मुदत वैधता ३ (तीन) वर्षेपर्यंत राहील. ह्या निश्चित केलेल्या मर्यादेत त्यापुढील वर्षाकरिता १०टक्के वाढ करायची आहे. या मर्यादेपर्यंत हंगाम निहाय उपमर्यादा राहील.

योजनेअंतर्गत समाविष्ट असलेल्या सभासदांची कमाल कर्ज मर्यादा विचारांत घेऊन "इ" करार पत्र व आवश्यक पत्रे घेण्यांत येईल. येतील. बँक अधिकाऱ्यांकडून पीकाखालील क्षेत्राची तपासणी होण्यापूर्वी व मशागतीचा खर्च भागविण्यासाठी सभासदांना मंजूर उपमर्यादेपर्यंतच्या २५ टक्के पर्यंत रोखीने कर्ज रकमेची उचल करता येईल. निरिक्षकाने स्थळ तपासणी केल्यानंतर उर्वरित रकमेची सभासदांना मंजूर मर्यादेपर्यंत उचल करता येईल. सभासदाला विड्राल स्लिप्स किंवा चेकने रकम काढतां येईल. परंतु याकरिता पत पत्र कार्ड/पास बुक सोबत आणले पाहिजे.

कर्जदार सभासदांना खते, बियाणे, औषधी, इ. माल संबंधित तालुक्यातील सहकारी संस्था अथवा खाजगी व्यापाऱ्यांकडून घेण्यास मुभा राहील. कर्जदार सभासदांनी खते, बियाणे, औषधे इ. मालाची उचल केल्या-नंतर दिलेला धनादेश व बिलाची दुसरी प्रत सहकारी संस्था अथवा व्यापाऱ्यांनी संबंधित बँकेच्या शाखेला सादर केल्यास धनादेशाची रक्कम परस्पर - विक्रेत्यास अदा करण्यांत येईल.

खरीप पीकांचे वितरण १एप्रील ते ३०सप्टेंबर या कालावधीत, रब्बी पीकाचे कर्ज वितरण दि. १ ऑक्टोबर ते ३१ मार्च व उन्हाळी पिकासाठी १जानेवारी ते ३१ मार्च या कालावधीत केले जाईल. बारमाही पीकाकरिता कर्जाचे वितरण लागवड कालावधी लक्षांत घेऊन केले जाईल. रब्बी व उन्हाळी कर्ज मर्यादेचा वापर खरीप बाकी शिल्लक असेल तरी देता येईल. मात्र सभा-सदाने खरीप उपमर्यादेवरील येणे बाकीची संपूर्ण परतफेड ३१मार्च पूर्वी करणे आवश्यक राहील.

कर्जवाटपाची प्रक्रिया नेहमीप्रमाणे खाते उघडूनच करावयाची आहे. क्रेडीट कार्डवरील कर्जदाराच्या सहीचा नमुना बँकेचे शाखाधिकारी/ हिशेबनीस प्रमाणीत करतील.

या योजनेअंतर्गत कर्ज मर्यादा मंजूर करण्यांत आलेल्या अविभक्त हिंदू कुटुंबातील कर्साकडून एकापेक्षा जास्त कर्जदाराबाबत सर्व कर्जदारांकडून खात्यावरील व्यवहार करण्यासंबंधी संमती पत्र

घेण्यांत येतील. योजनेअंतर्गत कर्जदाराने घेतलेल्या कर्जाचा विनियोग योग्य कारणा करिता होतो किंवा नाही हे पाहण्याकरिता विशिष्ठ कालावधीनंतर बँकेच्या शाखेमार्फत तपासणी करण्यांत येईल. कर्जदाराला मंजूर मर्यादेपेक्षा जादा उचल दिली जाणार नाही. दिलेली उचल ही त्या त्या हंगामासाठी निगडीत राहील.

किसान कार्ड धारकांसाठी कर्जाच्या परतफेडीच्या तारखा नेहमीच्या पध्दतीनुसार पीक कापणी व विक्री हंगामासाठी निगडीत राहतील. कर्जदाराने कर्ज परतफेडीच्या अंतिम तारखेला किंवा तत्पुर्वी हंगामासाठी मंजूर केलेल्या कर्जाची परतफेड करणे आवश्यक राहील. परतफेड वेळेवर न केल्यास कर्ज मर्यादा सवलत गोठविण्यांत येईल.

शेती कर्जाकरिता संपूर्ण वर्षासाठी मंजूर केलेल्या कर्ज मर्यादेची नोंद बँकेने कर्जासाठी तारण घेतलेल्या ७/१२ वर घेण्यांत येईल. हंगामानुसार उपमर्यादांचा उल्लेख किसान कार्ड वर करण्यांत येईल. सभासदांच्या जमिनीचा मालकी हक्कावर त्यावर मंजूर असलेल्या एकूण मर्यादितका बोझ्याचे "इ" करार पत्र द्यावे लागेल. नैसर्गीक आपत्तीमुळे मुदतीत कर्जाची परतफेड करु न शकल्यास व त्याप्रमाणे पैसेवारी जाहिर झाल्यास त्या कर्जाचे रुपांतर होईल.

या योजनेअंतर्गत किसान कार्ड, चेक बुक व इतर आवश्यक कागदपत्राचा खर्च जिल्हा बँकेला करावयाचा असून त्यापोटी किसान कार्ड धारकांकडून प्रत्येकी रुपये ५०/- वसुल करावयाचे आहे. किसान क्रेडिट कार्ड धारकांकडून कार्ड गहाळ झाल्यास किंवा हरविल्यास त्यास किसान कार्डची नक्कल (डुप्लीकेट) दिली जाईल. त्या करिता दंड म्हणून रु. २५/- आकारले जातील.

वरील प्रमाणे कर्जदार सभासदास रक्कम अदा केलेली (त्यांची) रक्कम त्या संस्थेच्या खाती नांवे टाकून तशी लेखी सुचना कर्जदार सभासदांच्या पतपुरवठा संस्थेकडे पाठविली जातील. सदर लेखी सुचनेच्या आधारावर पतपुरवठा सहकारी संस्थेच्या पातळीवर सभासदांच्या खात्याला जमा-नांवेच्या नोंदी करण्यांत येईल.

किसान कार्ड योजनेची अंमलबजावनी १९९९-२००० च्या खरीप हंगामापासून करण्याचे शासनाने ठरविले असल्यामुळे किसान कार्ड योजना राबविण्याबाबत मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पूणे, मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर तसेच मा. जील्हा. उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर. यांचेकडून किसान कार्ड योजना राबविण्यासंबंधी केलेल्या कार्यवाहीची माहिती पाठविण्याबाबत

सतत पाठपुरावा होत आहे. तसेच नाबार्ड, पूणे व राज्य सहकारी बँक यांचेकडूनही किसान कार्ड बाबतची आठवडी माहिती पाठविण्याबाबत पत्राद्वारे वारंवार पाठपुरावा होत आहे.

विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली. सदर योजनेनुसार मागील तीन वर्षापासून कर्ज उचल आणि कर्जाची नियमीत परतफेड करणाऱ्या म्हणजेच ज्या सभासदांचे कर्ज व्यवहार समाधानकारक आहेत अशा सभासदांची सदर किसान कार्ड योजनेकरिता निवड करावयाची आहे. मागील दोन तीन वर्षापासून अतिवृष्टीसारखी नैसर्गिक आपत्ती मुळे शेतकऱ्यांची पीक परिस्थिती समाधानकारक नसल्याने सभासद स्तरावर कर्ज वसुलीचे प्रमाण घटले आणि थकिताचे प्रमाण वाढले. अशा परिस्थितीत किसान कार्ड योजना राबविणे शक्य नसल्याने या वर्षी होणाऱ्या कर्ज वसुलीचा आढावा घेऊन माहे जुन १९९९ नंतर सदर योजना प्रायोगिक तत्वावर राबविण्याबाबत विचार करण्यात येईल. असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ११ - हातमाग विणकर सहकारी संस्थाकडील येणे व्याजाचे हप्ते पाडून देऊन कॅश क्रेडीट मर्यादेचे नुतनीकरण करणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ११ - मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले आणि सभेला माहिती देतांना सांगितले की, थकित असलेल्या हातमाग विणकर सहकारी संस्थांकडील थकित व्याजाचे हप्ते पाडून देवून संस्थांना यापूर्वी मंजूर असलेल्या पतमर्यादेचे नुतनीकरण करुन देणेबाबत बऱ्याच संस्थाकडून मागणी होत आहे.

यापूर्वी दिनांक ३१ मार्च १९९६ ला थकित असणाऱ्या ९२ संस्थापैकी ८८ संस्थांना त्यांचेकडील थकित असलेल्या व्याजाचे वार्षिक हप्ते पाडून देण्याचे मागणीनुसार ३१ मार्च १९९६ पर्यंत थकित असलेल्या व्याजाचे ५ हप्ते पाडून देण्यात आले. या ८८ संस्थापैकी ६१ संस्थांनी चालु व्याज व पहिल्या हप्त्याची वसुली दिल्यामुळे ९६-९७ सालाकरिता कर्ज नुतनीकरण मंजूर करण्यात आले होते.

त्यानंतर दिनांक ३१ मार्च १९९७ ला थकित असणाऱ्या ४ संस्थांना ३१ मार्च १९९७ पर्यंतचे थकित असलेल्या व्याजाचे संस्थांचे मागणीनुसार ४ वार्षिक हप्ते पाडून दिलेत. त्यापैकी ३ संस्थांनी चालू व्याज व थकित व्याजाच्या पहिला हप्ता वसुल दिल्यामुळे /अमा

केल्यामुळे ९७-९८ सालांकरिता कर्ज मुतनीकरण मंजूर करण्यांत आले होते.

वरीलप्रमाणे थकित संस्थाकडील येणे व्याजाचे हप्ते पाडून देऊन मुतनीकरणाची सवलत दिल्यानंतरही व्याजाचा भरणा नियमीत न केल्यामुळे ८ संस्था पुन्हा थकित झाल्यात व आता पुन्हा नव्याने दिनांक ३१ मार्च १९९९ पर्यंत थकित असणाऱ्या एकूण ७० संस्थापैकी २१ संस्थांनी ३१ मार्च १९९९ पर्यंत थकित असलेल्या व्याजाचे वार्षिक हप्ते पाडून कर्ज मुतनीकरण करणेसाठी बँकेला विनंती केली आहे.

संस्थांचे मागणीनुसार अशाप्रकारे संस्थांकडील थकित व्याजाचे हप्ते पाडून मुतनीकरण मंजूर केल्यास एन.पी.ए.च्या नॉर्मप्रमाणे बँकेला आपल्या उत्पन्नातून अशा असुरक्षित कर्जासाठी आवश्यक तरतुदी कराव्या लागतात तसेच वारंवार थकित व्याजाचे हप्ते पाडून मुतनीकरण केल्यास संस्थांचा व्याज/कर्ज वसुल देण्याकडे कल कमी होईल, व वसुलीचे प्रमाण कमी होईल.

वरील सर्व बाबींचा विचार करुन संस्थांकडील थकित व्याजाचे हप्ते पाडून कर्ज मर्यादा मंजूर करायचे झाल्यास खालील तीन अटीबाबत विचार होणे आवश्यक आहे.

१. दिनांक ३१ मार्च १९९९ अखेरच्या थकित व्याजापैकी ५०% रकमेचा भरणा करुन घेऊन उर्वरित व्याज येणे रकमेचे समान ५ वार्षिक हप्ते पाडण्यांत यावे.

२. असे हप्ते पाडतांना संस्थांचे बचत किंवा चालु खात्यांत रक्कम शिल्लक असल्यास तेवढी रक्कम व्याजांत वळती करुन उर्वरित रकमेचे हप्ते पाडून द्यावेत.

३. ही सवलत द्यावयाची झाल्यास बँकेच्या कर्जाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने संरक्षण म्हणून मंजूर मर्यादेपर्यंतच्या रकमेइतपत संस्थेच्या किंवा संस्थेच्या पदाधिकाऱ्यांचे स्थावर मालमत्तेवर कर्ज बोझ्याची नोंद करण्यांत यावी.

विषयाचे अनुषंगाने चर्चेत भाग घेतांना मा० श्री शहीर संचालक म्हणाले की, घालून दिलेल्या तिन्ही अटी काढून टाकाव्यांत व कर्ज मुतनीकरणाकरिता अर्ज केलेल्या थकित संस्थांकडील थकित व्याजाचे ५ वार्षिक हप्ते पाडून सन १९९९-२००० करिता कर्ज मर्यादेचे मुतनीकरण करुन संस्थांना मदत करावी. मा. श्री. पारशिवनीकर, संचालक यांनी अट क्रमांक १ व ३ न घालता अट क्रमांक २ घालण्यांत यावी व थकित व्याजाचे हप्ते पाडून कर्ज मर्यादेचे नुतनीकरण करून द्यावे असे मत मांडले. त्यांनी मांडलेल्या मतास मा. सौ. सिंधुताई कुंभारे, संचालिका, मा० श्री शिवणजी निमजे, मा० श्री विश्वनाथजी निमजे यांनी आपली सहमती दर्शविली.

बँकेच्या कर्ज सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातुन घातलेल्या ह्या नविन तिन्ही अटी योग्य आहेत व त्या कायम ठेवण्यांत याव्या असे मत मा० जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांनी मांडले. यापूर्वी संस्थांना

थकित व्याजाचे हप्ते पाडून देऊन थकित व्याजाचा पहिला हप्ता व चालु व्याज भरणाऱ्या संस्थांचे कर्जमर्यादा नुतनीकरण करुन देण्याबाबतची सवलत देण्यांत आली होती. परंतु ह्या सवलतीचा संस्थांनी फायदा घेतला नाही. त्यामुळे अशा सवलती वारंवार न देता एकदाच देण्यांत यावी. ~~आता~~ याबाबतही सभेत चर्चा झाली.

सविस्तर चर्चेअंती असे ठरले की, थकित व्याजाचे हप्ते पाडण्यासाठी विनंती करणाऱ्या संस्थांचे बचत किंवा चालु ठेव खात्यातील जमा रकमा थकित व्याजापोटी वसुल करुन उवरित व्याज रकमेचे ५ हप्ते पाडून प्रथम हप्ता व कर्जावरील चालु व्याज वसुलीनंतरच सन – १९९९-२००० करिता कर्जनुतनीकरणाबाबत मा. कर्ज उपसमितीने विचार करावा. मात्र अशी सवलत संस्थाना एकदाच देण्यांत यावी, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक १२ – शेतकी सेवा सहकारी संस्थांकडील बँक कर्ज व संस्थेतील सभासद कर्ज यांतील अनिष्ठ तफावत कमी करणेबाबतच्या सुचनांवर विचार करणे.

ठराव क्रमांक १२ – मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयाचे अनुषंगाने सभेला माहिती देतांना सांगितले की, बँक पातळीवर शेती पत पुरवठा संस्थांकडील येणेबाकी संबंधित संस्थांच्या सभासद कर्ज येणेबाकी पेक्षा जास्त असणे ही अनिष्ठ तफावत होय. बँकेला ५९३ सेवा/विविध कार्यकारी सहकारी संस्था संलग्न आहेत. त्यापैकी १९९७-९८ अखेर १९१ सेवा सहकारी संस्थांमध्ये रु. ४२०.३५ लाखाची अनिष्ठ तफावत आहे. मागील ५ वर्षातील अनिष्ठ तफावत खालीलप्रमाणे आहे.

| – वर्ष – | अनिष्ट तफावती तील संस्था संख्या | बँक स्तरावरील येणे | | | संस्थांच्या सभासदाकडील येणेकर्ज | | | अनिष्ठ तफावत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मुद्दल | व्याज | एकूण | मुद्दल | व्याज | एकूण | |
| सन ९३-९४ | १७४ | १२२२.३१ | ५५.०० | १२७७.३१ | ८४६.९८ | २१२.२० | १०५९.१८ | २१८.२५ |
| सन ९४-९५ | १७६ | १६०१.२७ | १०६.२४ | १७०७.५१ | १०८०.६२ | २५५.६१ | १३३६.२३ | ३७१.२२ |
| सन ९५-९६ | १८८ | १७१२.६२ | ९३.१५ | १८०५.७७ | १२०८.५३ | ३०६.३२ | १५१०.८५ | ३०४.९२ |
| सन ९६-९७ | १९१ | २२१२.४८ | ११६.०५ | २३२८.५३ | १५०९.९२ | ४६१.६१ | १९७१.५३ | ३५७.०० |
| सन ९७-९८ | १९१ | २४७१.३८ | २३०.८५ | २७०२.२३ | १९१७.३५ | ६३३.५३ | २५५१.८८ | ४२०.३५ |

१] शेतकी पतपुरवठा संस्थामध्ये अनिष्ठ तफावत निर्माण होण्याची प्रमुख कारणे खालील प्रमाणे आहेत.

१. नैसर्गिक आपत्तीमुळे अगर अन्य कारणामुळे कर्जाची वसुली अटीत कमी प्रमाणांत होऊन थकबाकीमध्ये वाढ होणे.

२. संस्थेला मिळणारी उत्पन्न मार्जीन विचारांत न घेता ज्यादा खर्च करणे.

३. सभासदांकडून आलेल्या वसुलीची रक्कम, गोडाऊन, फर्निचर, स्टेशनरी इत्यादि मध्ये गुंतवणुक करणे तसेच शासकीय कर्ज व गोडाऊन कर्जाची भरणा करणे.

४. हस्तस्थ शिल्लक बाळगणे.

५. अपहार व गैरव्यवहारांत रकमा अडकून पडल्यामुळे व कोर्टाचे निकाल लवकर लागत नसल्यामुळे.

६. सभासद कर्जावरील व्याजाची आकारणी चुकीची झाल्यामुळे.

७. इतर विभागामध्ये (धान्य दुकान, खत धंदा) रकमा गुंतविल्यामुळे.

८. अनावश्यक नोकर भरतीमुळे.

९. कर्ज दाम दुपटीच्या नियमामुळे

१०. संस्थांचे हिशेब चुकीचे लिहिल्यामुळे.

११. सभासदाकडून वसूल झालेले मुद्दल, व्याजाची रक्कम संस्था सभासदांचे मुद्दल व्याजांत घेते. परंतु बँक स्तरावर संस्थेकडील बँक कर्ज बाकीवरील वसूल करणे असलेल्या व्याजांत प्रथम घेते त्यामुळे वरील बाबीमुळे अनिष्ठ तफावत पडते.

२] बँक कर्ज व सभासद कर्ज यामधील अनिष्ठ तफावत दिवसेंदिवस वाढत आहे. मोल आवर घालण्याच्या दृष्टीने उपाययोजना करणे आज जरुरीचे झाले आहे. संस्थेची थकबाकी कमी करावयाची असेल तर सभासदांची आर्थिक स्थिती सुधारली पाहिजे. सभासदांचे कोरडवाहू क्षेत्र ओलीताखाली यावयास पाहिजे. सध्याचे ओलित क्षेत्र वाढले पाहिजे. सभासदांनी शेतीपूरक जोडधंदे अंगीकृत केले पाहिजे. शेतीपुरवठा संस्थेने सर्व प्रकारचे व्यवहार हाताळले पाहिजेत. शेती पतपुरवठा संस्थांचा व्यवहार किमान रु.१०.०० लाखाचा झाला पाहिजे. असे होत नसेल तर शेती पतपुरवठा संस्थेचे एकत्रिकरण व्हावयास पाहिजे. प्रत्येक संस्थेस पूर्ण वेळ सचिव असणे जरुरी आहे. गटसचिवाने निर्धारित कार्यालयीन वेळेत संस्थेमध्ये उपस्थित राहिले पाहिजे. पंचकमीटीने संस्थेच्या सर्व प्रकारच्या कामकाजांत स्वारस्य दाखविले पाहिजे. पंचकमेटीला गटसचिवावर प्रशासकीय अंकुश ठेवण्याचे अधिकार असले पाहिजेत. शेती पतपुरवठा संस्थेकडे आलेली संपूर्ण वसुली बँकेत भरली गेली पाहिजे. आलेल्या वसुली रकमेचा जमाखर्च बँकेच्या प्रचलित धोरणानुसार

करण्यांत आला पाहिजे. थकबाकी होऊ नये म्हणून सभासदांशी वेळीच संपर्क साधून वसुली व्हावयास पाहिजे. दामदुप्पट व्याज होऊ नये ही कायद्यातील तरतुद रद्द व्हावयास पाहिजे. संस्थेच्या स्वनिधी व ठेवी वाढल्या पाहिजेत. संयुक्त खर्च वर्गणी आकारणीची पध्दती बदलावयास पाहिजे. घरभाडे, प्रवासभत्ता, किरकोळ खर्च, आमसभा खर्च यासारख्या खर्चावर आवर घालण्याच्या दृष्टीकोनातून प्रभावी उपाय योजना केल्या गेल्या पाहिजेत. नियमबाह्य हाल शिल्लक व अफरातफर यामध्ये गुंतलेल्या प्रकरणांत वसुलीच्या दृष्टीने सहकार खात्याकडून प्रभावी उपाययोजना अंगिकारली गेली पाहिजे. कर्जमाफी केल्यामुळे अशी कर्जमाफी वारंवार होऊ शकते. ही जी भावना सभासदांमध्ये रुजत आहे त्याबाबत अशी कर्जमाफी पुन्हा होणार नाही, हे वारंवार सांगून याबाबतची जागृती सभासदां मध्ये निर्माण केली पाहिजे. असे झाल्यास बँक कर्ज व सभासद कर्ज या यामधील अनिष्ठ तफावत हळूहळू कमी होऊ शकेल.

विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली आणि चर्चेअंती बँक कर्ज व सभासद कर्ज यामधील अनिष्ठ तफावत कमी करणेकरिता सुचविण्यांत आलेल्या सुचनांचा प्रथम अभ्यास करण्यांत येईल व त्यानंतर अनिष्ठ तफावत कमी करणेकरिता सुचविलेल्या उपाय योजना अमलांत आणणेकरिता कार्यवाही करण्यांत येईल असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ९३ - मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दि. १८.७.१९९५ चे पत्राप्रमाणे मिळालेल्या परवानगीनुसार चपराशी नियुक्त करणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ९३ - मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दि. १८.७.१९९५ चे पत्राप्रमाणे बँकेत १४८ जागा भरण्यास अनुमती मिळालेली आहे. या १४८ जागांपैकी २७ जागा चपराशी पदाच्या आहेत.

मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे दि. १८.७.१९९५ चे पत्राप्रमाणे बँकेत १४८ जागा भरण्यास अनुमती मिळाली आहे. या १४८ जागांपैकी २७ जागा चपराशी पदाच्या आहेत.

परवानगी मिळाल्यानंतर कर्मचारी भरतीची प्रक्रिया सुरु

करण्यात आली. सेवायोजन कार्यालय नागपूर, जिल्हा समाज कल्याण कार्यालय नागपूर, आदिवासी विकास प्रकल्प नागपूर येथून चपराशी पदाकरिता उमेदवारांच्या याद्या मागविण्यांत आल्या. तसेच जाहिरातीद्वारे अर्ज मागविण्यांत आले अर्ज छाननीची प्रक्रिया सुरु व्हायचे अगोदर कर्मचारी युनियनच्या स्थगनादेश आल्यामुळे कर्मचारी भरतीची प्रक्रिया थांबली. त्यानंतर मा. उच्च न्यायालयाचे दि. ६.११.१९९६ चे निर्देशाप्रमाणे कर्मचारी भरतीची प्रक्रिया सुरु करण्यांत आली. दि. १० जुलै १९९८ चे मा. उच्च न्यायालयाचे निर्देशानुसारच लिपीकांची भरती ६७ लिपिक निवड यादीमधून आणि १३ लिपिक बँकेतील चपराशी श्रेणीतील कर्मचाऱ्यांमधून पदोन्नतीने करण्यांत आलेली आहे.

चपराशी श्रेणीतील १३ कर्मचारी लिपिक श्रेणीत गेल्यामुळे चपराशी कर्मचाऱ्यांची संख्या कमी झालेली आहे. चपराश्यांची मंजूर पदे १७७ आहेत. आणि ३१.३.१९९९ रोजी चपराशी संख्या १२६ आहे म्हणजेच ३१.३.१९९९ रोजी चपराशी श्रेणीतील ५१ जागा रिक्त आहेत.

मा. सहकार आयुक्त व निबंधक, यांनी २७ चपराशी भरणेकरिता अनुमती दिलेली आहे. अर्ज छाननीचे काम पूर्ण झालेले आहे. चपराशी श्रेणीत कर्मचारी नियुक्ती करिता पुढील प्रक्रिया प्रलंब गुलखत घेणे ही आहे.

विषयाचे अनुषंगाने चर्चा होऊन मा. सहकार आयुक्त व निबंधक यांनी दि. १८.७.१९९५ चे पत्राप्रमाणे दिलेल्या परवानगीनुसार २७ चपराशी भरणेकरिता कार्यवाही करण्यास मान्यता देण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक १४ – मा. अध्यक्ष यांचे परवानगीने ऐनवेळी येणारे विषय.

विषय क्रमांक १४(१) – विकासात्मक कृती सुधार कार्यक्रम व वार्षिक सामंजस्य करार [अन्युअल एम.ओ.यु.] अंतर्गत सन १९९९-२००० या वर्षाकरिता नाबार्ड [राष्ट्रिय बँक] व राज्य बँकेनी ठरवून दिलेल्या उद्दिष्ट्यांना मंजूरी देणे.

ठराव क्रमांक १४(१) – मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले आणि विषयाचे अनुषंगाने मा. सरव्यवस्थापक यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, दि. १६.४.१९९९ रोजी महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्या. प्रादेशिक कार्यालय, नागपूर येथील कार्यालयांत झालेल्या सभेत मागील वार्षिक सामंजस्य करारा अंतर्गत सन १९९६-९७; १९९७-९८; व १९९८-९९ च्या ३१.१२.९८ च्या त्रैमासीक स्थितीचा नाबार्ड व राज्य बँकेकडून आढावा घेण्यांत आला. व त्यानंतर सन १९९९-२००० या वर्षाकरिता ठेवी व कर्जे, स्वनिधी इत्यादी व्यवहारांत होणारी अपेक्षित वाढ विचारांत घेऊन उद्दिष्ट

ठरवून देण्यांत आले आहे. त्या दृष्टीने कराराची अंमलबजावनी करण्या-करिता कालबध्द विकासात्मक कृती कार्यक्रम नाबार्डने पुरस्कृत केलेला आहे. त्यानुसार बँकेच्या व्यवहारांत वाढ करण्याचा व कामकाजांत सुधारणा करण्याचा बँकेने प्रयत्न करावयाचा आहे.

विषयाचे अनुषंगाने सविस्तर चर्चा होऊन सामंजस्य करारा अंतर्गत (एम.ओ.यू.) बँकेला सन १९९९-२००० या वर्षाकरिता नाबार्डने ठरवून दिलेले उद्दिष्ट तसेच कृती विकास कार्यक्रमास सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली. तसेच सामंजस्य करारावर सह्या करण्याचे अधिकार बँकेचे सरव्यवस्थापक यांना देण्यांत आले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक १४(२) - सन १९९९-२००० मध्ये बँकींग प्लॅन अंतर्गत कर्ज वाटपांत महत्तम वाढ करण्याबाबत राज्य बँकेने मंजूरी दिलेल्या कर्ज-वाटप लक्षास व त्या अनुषंगाने करावयाची कार्यवाहीस मंजूरी देणे.

ठराव क्रमांक १४(२) - मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयाचे अनुषंगाने सभेला माहिती देतांना सांगीतले की, शेतकऱ्यांची पीक उत्पादकता वाढावी आणि त्यांचा जीवनस्तर उंचावण्यासाठी आर्थीक विकास व्हावा या दृष्टीने मागील कालावधीतील कर्जवाटप व कर्जवसुलीचा आढावा घेऊन दि महाराष्ट्र स्टेट को-ऑप. बँक लि; प्रादेशिक कार्यालय, नागपूर यांनी पत्र क्र. प्रा.का./नागपूर/विकास कक्ष/पा-२१२/११/९९/९९-२००० दिनांक - २३-४-१९९९ चे पत्रानुसार या आर्थिक वर्षात बँकींग प्लॅन अंतर्गत विविध कर्ज कारणाकरिता जास्तीत जास्त कर्जवाटपाचे लक्ष/उद्दिष्ट निर्धारित करून दिलेले आहे. विविध कर्जकारणाकरिता अंतर्गत वेगवेगळ्या कर्ज कारणाकरिता निर्धारित करून दिलेले लक्ष खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कर्जवाटपाचे कारण | कर्ज वाटपाचे निर्धारित लक्ष (रु. लाखांत) |
|---|---|---|
| १. | कृषि यांत्रिकीकरण | |
| | अ) ट्रॅक्टर + ट्राली | |
| | ब) थ्रेशर | ६००.०० |
| | क) कृषि अवजारे | |
| | ड) पावर टीलर | |
| २. | लहान उपसा जलसिंचन योजना | २००.०० |

| | | |
|---|---|---|
| ३. | मध्यम व दिर्घ मुदती तुरळक नियमीत व प्रकल्पा अंतर्गत शेती कर्जे - | |
| | अ) लघुसिंचन | |
| | ब) दुग्ध व्यवसाय/दुभती जनावरे | |
| | क) शेळी/मेंढी/वराह पालन | |
| | ड) कुक्कुट पालन | |
| | ई) फळेबाग | ३५०.०० |
| | ई) रेशिम उद्योग | |
| | उ) मत्स्य व्यवसाय | |
| | ऊ) आय.आर.डी.पी. | |
| | त) एस.आर.टी.ओ. | |
| | थ) इतर शेतीपुरक | |
| ४. | अनुसुचित जाती/जमाती विकास - | ९२.०० |
| | | एकुण रुपये ९२६२.०० |

वरीलप्रमाणे विविध कर्जे कारणासाठी बँकींग प्लॅन अंतर्गत सन १९९९-२००० मध्ये एकुण रुपये ९२६२.०० लाखाचे महत्तम कर्ज वाटपाचे लक्ष राज्य बँकेने निर्धारित करुन चालु आर्थिक वर्षात जास्तीत जास्त कर्जवाटप करुन कर्ज वाटपाचे दिलेले लक्ष पूर्ण करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्याकरिता सुचना दिलेल्या आहेत.

विविध कर्ज कारणा अंतर्गत कर्जवाटप करणेकरिता कराव्या लागणाऱ्या आवश्यक कार्यवाहीची रुपरेषा खालील प्रमाणे सुचविली आहे. विविध कर्ज कारणा अंतर्गत होणाऱ्या कर्जवाटपामुळे शेतकऱ्यांचे पिकोत्पादन व कर्जफेड क्षमतेत निश्चितच वाढ होऊन पर्यायाने बँकेच्या आर्थिक परिस्थितीवर अनुकुल परिणाम होण्यास मदत होणेकरिता वर निर्देशित कर्ज वाटपाची लक्ष शाखा निहाय/शाखेतील निरिक्षक निहाय आवंटीत करुन द्यावी. आणि त्यांचे पूर्तते विषयी दरमहा आढावा घेण्यात यावा.

वरीलप्रमाणे सन १९९९-२००० या आर्थिक वर्षाकरिता निर्धारित करण्यांत आलेले महत्तम कर्ज वाटपाचे लक्ष तसेच रु. ९२६२ व त्या दृष्टीने करावयाच्या आवश्यक शाखा स्तरिय कार्यान्वीत कार्यवाहीचे रुपरेषेला मंजूरीसाठी विषय आलेला आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे वर उल्लेखित दि. २३.४.९९ चे पत्रान्वये सन १९९९-२००० या आर्थिक वर्षा-करिता विविध कर्ज कारणा अंतर्गत निर्धारित करण्यांत आलेले कर्ज

वाढ्याचे रु. १२६८ लाखाचे उद्दिष्ठ पूर्ण करण्याचे दृष्टीने प्रत्येक शाखा स्तरावर सक्रिय प्रयत्न करण्यांत यावे असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक १४(३) – सन १९९८-९९ या आर्थिक वर्षातील शाखा ठेवींचे उद्दिष्टे व पुर्ततेबाबत आढावा घेऊन सन् १९९९-२००० या वर्षाकरिता शाखा उद्दिष्ठ निर्धारित करणे.

ठराव क्रमांक १४(३) – मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व विषयाचे अनुषंगाने सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेच्या आज मितीस मुख्य कार्यालयासह ८६ शाखा कार्यरत आहेत. सन १९९८-९९ या वर्षाकरिता सुरुवातीस शाखांना रुपये २५२.०५ कोटी ठेवींची उद्दिष्ठ ठेवण्यांत आली होती. त्यानंतर सुधारणा करुन शाखांना रुपये ३०५.१५ कोटीचे सुधारित उद्दिष्ठ देण्यांत आले होते. शाखांनी ३१ मार्च १९९९ अखेर प्रत्यक्षांत रु. २४४.६१ कोटी ठेवी गोळा केल्यात.

दिनांक १०.४.९९ रोजी झालेल्या शाखा व्यवस्थापकांच्या सभेत ठेवी संकलनाच्या मागील ४ वर्षाचा आढावा घेण्यांत आला. मागील ४ वर्षातील शाखेचा ठेवी वाढीचा वेग व गत वर्षातील परिस्थिती (ट्रेंड) विचारांत घेऊन सन १९९९-२००० या वर्षाकरिता रु. ५००.१५ कोटी ठेवी गोळा करण्याचे उद्दिष्ट ठरविण्यांत आले. मागील वर्षापेक्षा रु. २५५.५४ कोटी ठेवी जास्त गोळा करावयाच्या आहेत.

विषयाचे अनुषंगाने सभेत चर्चा होऊन सन १९९९-२००० या वर्षाकरिता शाखानिहाय उद्दिष्ठ ठरविण्यांत आले. उद्दिष्ठ पूर्ण करण्यासाठी अधिकाधिक प्रयत्न करण्यांत यावे असे ठरले.

(रुपये लाखांत)

| अ.क्र. | शाखेचे नांव. | सन ९८-९९ करिता उद्दिष्ठ | सन ९८-९९ करिता सुधारित उद्दिष्ठे ३१ मार्च ९९ अखेर | दिनांक ३१.३.९९ ची पुर्तता | सन १९९९-२००० चे उद्दिष्ठ. |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६. |
| | **नागपूर** | | | | |
| १. | मुख्य कार्यालय | १७००.०० | ५२००.०० | ३९६६.४६ | ७४६०.०० |
| २. | महाल | १२६०.०० | २०००.०० | १३६५.७४ | २७३०.०० |
| ३. | हनुमाननगर | ५६०.०० | ७००.०० | ४०६.२४ | १०१०.०० |
| ४. | जिल्हा परिषद | ७२०.०० | ८००.०० | ४६०.०० | ११२०.०० |
| | शाखा ठेवी खी जिल्हा परिषद | २६००.०० | ३७००.०० | १०६०.६७ | ३७१०.०० |

| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. |
|---|---|---|---|---|---|
| ५. | गांधीबाग | ४७५.०० | ८५०.०० | ५३४.७९ | १०७०.०० |
| ६. | पांचपावली | ३९०.०० | ५००.०० | ३५२.९१ | ७१०.०० |
| ७. | रामनगर | ११००.०० | १३५०.०० | ११९१.१२ | २३७०.०० |
| ८. | धंतोली | ६५०.०० | ८५०.०० | ६१८.२४ | १२३५.०० |
| ९. | धान्यगंज | १५५.०० | २५०.०० | १४४.३२ | २९०.०० |
| १०. | वाडी | ९६.०० | १५०.०० | ७९.७१ | १६०.०० |
| ११. | जरीपटका | १६०.०० | २००.०० | १४९.५४ | २७०.०० |
| १२. | सक्करदरा | ११०.०० | ३००.०० | १४१.२६ | ३००.०० |
| | नागपूर ग्रामीण | | | | |
| १३. | गणेशपेठ | ५००.०० | ६२५.०० | ४१५.८६ | ८३०.०० |
| १४. | बुटीबोरी | ५५०.०० | ७५०.०० | ५०१.०९ | १०००.०० |
| १५. | पेठ | २४०.०० | ३५०.०० | २६६.५८ | ५००.०० |
| १६. | कळमना बाजार | २३०.०० | ३५०.०० | २०२.८१ | ४००.०० |
| १७. | विहिरगांव | १०६.०० | १५०.०० | ९१.२५ | १७०.०० |
| १८. | फेटरी | १२०.०० | १७५.०० | ११०.०१ | २३०.०० |
| १९. | कामठी तालुका | | | | |
| २०. | कामठी | ४६०.०० | ६५०.०० | ३५९.९४ | ७२०.०० |
| २१. | वडोदा | ११०.०० | १७५.०० | १०२.०९ | २००.०० |
| २१. | दिघोरीस्टेशन | ६०.०० | ७५.०० | ६६.७१ | १००.०० |
| २२. | कोराडी | ४१५.०० | ५५०.०० | ३६०.१३ | ७२०.०० |
| | हिंगणा तालुका | | | | |
| २३. | हिंगणा | ५७०.०० | ७००.०० | ५३०.२४ | १०६०.०० |
| २४. | गुमगांव | १७०.०० | २७५.०० | १५५.७० | ३१०.०० |
| २५. | कान्होलीबारा | १३०.०० | २००.०० | १०१.०६ | २००.०० |
| २६. | टाकळघाट | ७५.०० | १२५.०० | ७०.९१ | १४०.०० |
| २७. | कवडस | ३५.०० | ५०.०० | २९.७० | ६०.०० |
| २८. | मोहगांव (झिल्पी) | १५०.०० | २२५.०० | १२८.८७ | २६०.०० |
| २९. | आडेगांव | ३०.०० | ४०.०० | २५.४३ | ५०.०० |
| | रामटेक तालुका | | | | |
| ३०. | रामटेक | ५२५.०० | ६००.०० | ३३३.८२ | ६७०.०० |
| ३१. | नगरधन | ३५.०० | ६०.०० | ४०.८७ | ८०.०० |
| ३२. | पवनी | ९०.०० | १६५.०० | ९५.२७ | १९०.०० |
| ३३. | देवलापार | ६४.०० | ५०.०० | ६४.७८ | १३०.०० |
| ३४. | मनसर | १७०.०० | २२०.०० | १३९.४१ | २७०.०० |
| | पारशिवनी तालुका | | | | |
| ३५. | पारशिवनी | ५१०.०० | ६५०.०० | ४७३.१३ | ९५०.०० |
| ३६. | कन्हान | ३७०.०० | ५५०.०० | ३७२.१७ | ७७०.०० |
| ३७. | नवेगांव खैरी | ४५.०० | ७५.०० | ३९.७४ | ८०.०० |
| | मौदा तालुका | | | | |
| ३८. | मौदा | ४२५.०० | ५००.०० | ३४१.८९ | ६८०.०० |
| ३९. | खात | १००.०० | १५०.०० | ९७.७७ | २००.०० |
| ४०. | अरोली | ७२.०० | १४०.०० | ७१.४३ | १४०.०० |

| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. |
|---|---|---|---|---|---|
| ४१. | तारसा | १३५.०० | १६५.०० | १२७.९३ | २६०.०० |
| ४२. | धानला | ९०.०० | १३५.०० | ८८.२१ | १८०.०० |
| ४३. | मारोडी | १२५.०० | १७५.०० | १३३.१८ | २७०.०० |
| ४४. | रेवराळ | ६५.०० | ९०.०० | ६०.९३ | १२०.०० |
| ४५. | गोवरी | ९२.०० | १३५.०० | ९६.६५ | १९०.०० |
| | काटोल तालुका | | | | |
| ४६. | काटोल | ५००.०० | ६५०.०० | ४०८.६७ | ८२०.०० |
| ४७. | कोंढाळी | २६०.०० | ३७५.०० | २५५.५२ | ५१०.०० |
| ४८. | रिधोरा | १७०.०० | २२५.०० | १५१.०० | ३००.०० |
| ४९. | येनवा | ७०.०० | १२५.०० | ६९.६६ | १८०.०० |
| ५०. | पारडसिंगा | १४०.०० | २००.०० | १२६.३१ | २५०.०० |
| ५१. | मेट्पांजरा | ८०.०० | १००.०० | ६७.०५ | १७०.०० |
| | नरखेड तालुका | | | | |
| ५२. | नरखेड | ४३०.०० | ४७५.०० | ३०२.५७ | ६१०.०० |
| ५३. | जलालखेडा | २०५.०० | ३२५.०० | २०२.६६ | ४००.०० |
| ५४. | सावरगांव | २३०.०० | ३००.०० | १९५.०१ | ३९०.०० |
| ५५. | मोवाड | १२०.०० | १७०.०० | १०५.२३ | २१०.०० |
| ५६. | पिपळा केवळराम | ६५.०० | ८०.०० | ५३.३२ | १००.०० |
| ५७. | लोहारी सावंगा | ४६.०० | ८०.०० | ४२.५८ | ९०.०० |
| ५८. | थाडीपवनी | ८०.०० | १००.०० | ७४.११ | १५०.०० |
| ५९. | बेलोना | ८०.०० | १००.०० | ६५.५७ | १३०.०० |
| ६०. | मेंढला | ७५.०० | ९०.०० | ६०.८६ | १२०.०० |
| | सावनेर तालुका | | | | |
| ६१. | सावनेर | ७४०.०० | ९५०.०० | ७७१.९७ | १५५०.०० |
| ६२. | खापा | ४२५.०० | ५००.०० | ३८०.१५ | ७५०.०० |
| ६३. | पाटणसावंगी | २९०.०० | ३५०.०० | ३००.९५ | ६००.०० |
| ६४. | बडेगांव | ५५.०० | ९५.०० | ४९.७६ | १००.०० |
| ६५. | केळवद | २१५.०० | ३००.०० | २०९.०५ | ४२०.०० |
| ६६. | नांदागोमुख | ११०.०० | १७५.०० | ११९.५० | २४०.०० |
| ६७. | खापरखेडा | ३८०.०० | ५००.०० | ३६९.८३ | ७४०.०० |
| | कळमेश्वर तालुका | | | | |
| ६८. | कळमेश्वर | ५७५.०० | ८७५.०० | ५५१.४१ | ११००.०० |
| ६९. | मोहपा | २१५.०० | ३००.०० | १९४.६३ | ३९०.०० |
| ७०. | धापेवाडा | १७५.०० | २५०.०० | १६३.०३ | ३२०.०० |
| ७१. | कोहळी | १३०.०० | २००.०० | १२५.३९ | २५०.०० |
| | उमरेड तालुका | | | | |
| ७२. | उमरेड | ४५०.०० | ६००.०० | ३९७.५१ | ८००.०० |
| ७३. | बेला | ३८०.०० | ५५०.०० | ३९९.११ | ७४०.०० |
| ७४. | सिर्सी | १५०.०० | २२५.०० | १३९.२९ | २८०.०० |
| ७५. | पाचगांव | १६५.०० | २२५.०० | १७६.२९ | ३५०.०० |
| ७६. | मकरधोकडा | ९५.०० | १२०.०० | ८५.८२ | १७०.०० |
| ७७. | ब्राम्हणी | ४५.०० | ६०.०० | ४०.२६ | ८०.०० |
| ७८. | वेडेश्वर | ९५.०० | १३५.०० | ८७.५६ | १८०.०० |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| | शिवापूर तालुका | | | | |
| ७९. | शिवापूर | २४५.०० | ३२५.०० | २२४.२३ | ४५०.०० |
| ८०. | नोंद | ९५.०० | १३५.०० | ८८.८८ | १५०.०० |
| ८१. | बेसुर | ५५.०० | ८०.०० | ५०.३८ | १००.०० |
| ८२. | जवळी | ३६.०० | ५०.०० | ३१.३७ | ६०.०० |
| | कुही तालुका | | | | |
| ८३. | कुही | ४१५.०० | ५००.०० | ३५४.२३ | ७००.०० |
| ८४ | वेलुर | ७५.०० | १२५.०० | ३०.८२ | १५०.०० |
| ८५ | मांढळ | १४०.०० | २००.०० | १२२.२६ | २४०.०० |
| ८६. | गोठणगांव | ४०.०० | ५०.०० | ४०.३२ | ८०.०० |
| | एकूण बेरीज .. | २५२०२.०० | ३७५१५.०० | २४४६१.७६ | ५००१५.०० |

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक १४(४) - मध्यम मुदती जीप, व्हॅन, कार वाहनांच्या कर्ज परतफेड मुदतीत वाढ करण्याबाबत --

ठराव क्रमांक १४(४) - मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले आणि सभेला विषयाचे अनुषंगाने माहिती देतांना सांगितले की, बँकेतर्फे सेवा सहकारी संस्थेच्या सभासदांना शेती कर्ज अंतर्गत जीप तसेच रोड ट्रान्सपोर्ट व व्यवसायाकरिता अर्जदाराचे अथवा जामिनदाराचे स्थायी मालमत्तेचे तारणावर जीप, प्रवासी कार, मारुती व्हॅन करिता कर्ज उपलब्ध करुन देण्यांत येते. सध्याच्या प्रचलित धोरणानुसार अशा प्रकारच्या वाहन कर्जाची परतफेड मुदत ही तीन वर्षे म्हणजे ३६ महिने ठेवण्यांत आली आहे. ह्या कर्जाची परतफेड जरी तीन वर्षे मुदतीसाठी असली तरी शेती कर्जांतर्गत जीपची त्रैमासीक तर इतर वाहनांची कर्ज परतफेड ही मासिक हप्तांमध्ये व्याजासहित करावयाची असते.

सदर कर्जांतर्गत तीन वर्षे परतफेड मुदत ही फारच कमी होत असून, त्यामुळे कर्जहप्ता मोठ्या प्रमाणांत येत असतो. त्याची परतफेड करण्यास कर्जदार सभासदांना कठीण जात असल्याने बहुतांशी सभासदांनी या कर्जाची परतफेड करणेकरिता मुदत वाढविण्याबाबत विनंती केली. या कर्जांतर्गत येणारा कर्ज हप्ता हा अपेक्षेपेक्षा जास्त असल्याने बँकेच्या ओत परतफेड करण्यास असमर्थ झाल्यामुळे थकित कर्जाचे प्रमाण वाढत आहे.

अशा परिस्थितीत जर सदर कर्जाची परतफेड मुदत ५ वर्षे ठेवल्यास सभासदास कर्ज परत फेड करण्यास दिलासा मिळून कर्ज हप्ता वेळेवर भरण्यास मदत होऊ शकते.

उदाहरणार्थ = या कर्जांतर्गत सभासदास रु.३.०० लाख कर्ज दिल्यास त्याचा हप्ता खालील प्रमाणे भरावा लागेल.

| | मुद्दल | व्याज | मुद्दल | व्याज |
|---|---|---|---|---|
| १. वार्षिक हप्ता | १०००००/- | ४५०००/- | ७५०००/- | ४५०००/- |
| २. त्रैमासिक हप्ता | २५०००/- | ११२५०/- | १८७५०/- | ११२५०/- |
| ३. मासिक हप्ता | ८३३४/- | ३७५०/- | ६२५०/- | ३७५०/- |

वरील प्रमाणे तुलनात्मक माहिती लक्षांत घेता, जीप, कार, टॅक्सी, व्हॅन कर्जाकरिता सध्याचे कर्ज धोरणांतील तीन वर्षे कर्ज परतफेडीचा कालावधी वाढवून चार वर्षे केल्यास कर्जदार सभासदांना परतफेडीचा कर्ज हप्ता कमी येणार असल्याने कर्जाची परतफेड करणे सुलभ होईल.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन या योजने अंतर्गत कर्ज घेणाऱ्या सभासदांना कर्ज परतफेड करणे सोयीचे होण्याचे दृष्टीने सध्याचा कर्ज परतफेडीचा तीन वर्षाचा कालावधी वाढवून ४ वर्षे करण्यांत यावा, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक १८ (५) - दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. मुंबई यांचेकडून बँकेने पगारदार नोकरांच्या पत संस्थांना दिलेल्या कर्जापोटी फेर कर्ज मर्यादा मिळण्यासंबंधी विचार करणे.

ठराव क्रमांक १८ (५) - मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, सन १९९८-९९ हंगामातील बँकेचे कर्ज वसुलीची परिस्थिती असमाधानकारक आहे. माहे एप्रिल ९९ मध्ये ठेवीत रु. १०.०० कोटीची घट झाली असून, पुढे येणाऱ्या पेरणीच्या हंगामाकरिता दरवर्षी प्रमाणे ठेवीत कोही प्रमाणांत घट होण्याची शक्यता नाकारता येत नाही. पगारदार संस्थाकडून बँकेची कर्जबाकी रु. ३२.३६ कोटीचे वर असून कर्ज मागणी वाढत आहे. कर्जाची वाढत असलेली मागणी लक्षांत घेता पगारदार नोकरांच्या सहकारी संस्थांना दिलेल्या कर्जावर रु. २२.०० कोटीची फेरकर्ज मर्यादा मागणीकरिता दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्यादित, मुंबई यांचेकडे अर्ज करणे करिता खालील प्रमाणे ठराव करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येत आहे.

Exh - 3158 - A/3 168

Exh - 3158

ठराव

सन ९८-९९ हंगामातील बँकेचे कर्जवसुलीची परिस्थिती असमाधानकारक आहे. माहे एप्रिल ९९ मध्ये ठेवीत रुपये १०.०० कोटीची घट झाली असून, पुढे येणाऱ्या पेरणीच्या हंगामाकरिता ठेवीत कांही प्रमाणात घट होण्याची शक्यता नाकारता येत नाही. पगारदार संस्थांकडून बँकेची दि. ३१.३.९९ रोजी कर्जबाकी कॅश क्रेडीट रुपये १३.१८ कोटी आणि मुदती कर्ज रु० १९.१८ कोटी एकूण रुपये ३२.३६ कोटीचे असून कर्ज मागणी वाढत आहे. यापैकी अनुक्रमे रु. २.५१ लाख आणि रु० १०.२० थकित कर्ज आहे. कर्जाची वाढत असलेली मागणी लक्षात घेता पगारदार नोकरांच्या सहकारी संस्थाना दिलेल्या कर्जावर रुपये २२.०० कोटीची फेर कर्ज मर्यादा मागणी करिता दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, मुंबई यांचेकडे अर्ज करण्यात यावा. मर्यादा मागणीचे अर्जावर सही करण्याचे अधिकार मा० अध्यक्ष व सरव्यवस्थापक यांना देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक १८ (६) – सेक्युरिटीजची खरेदी-विक्री करण्यासाठी राज्य सहकारी बँकेमार्फत रिझर्व बँक मुंबई येथे सबसिडीअरी जनरल लेजर खाते चालू केले आहे. त्यांत आपले बँकेचा सहभाग करुन त्याद्वारे व्यवहार करण्यास मान्यता देणे

ठराव क्रमांक १८ (६) – मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, तरती जिंदगी राखण्याकरिता मान्य असलेल्या रोख्यांची मुंबईचे शेअर मार्केटमध्ये खरेदी-विक्री केली जाते. आपल्या बँकेजवळ असलेले रोखे जास्त भावाने विकून कमी भावांत रोखे खरेदी करुन पुन्हा जास्त भावाने विक्री असा व्यवहार शेअर बाजारांत केला जातो. हा व्यवहार करण्यासाठी रिझर्व बँकेने केलेल्या नविन नियमानुसार रिझर्व बँकेद्वारे व्यवहार करावा लागतो. रोख्यांची खरेदी-विक्री होतांना प्रत्यक्षात रोखे संबंधित व्यक्ती/संस्थेजवळ न राहतां ती रिझर्व बँकेजवळ राहतात. आणि रिझर्व बँकेकडे असलेल्या रोख्यांची यादी प्रमाणित करुन दिली जाते. खरेदी-विक्री केल्यास तेवढी रक्कम एस.जी.एल. खात्यातून जमा किंवा नावे केली जाते. आणि विक्रीत आलेल्या नफा किंवा व्याज दिल्या जाते. हा शेअर मार्केटच्या व्यवहार मुंबईला होत असल्यामुळे राज्य बँकेतर्फे सबसिडीअरी जनरल लेजर खाते रिझर्व बँकेत उघडण्यात आले आहे. त्याद्वारे सिक्युरिटीजच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहार करण्यास मान्यता देण्याकरिता खालील प्रमाणे ठराव करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येत आहे.

## - RESOLUTION -

Resolved that the General Manager and Chief Accountant Jointly be and are hereby authorised to enter into an agreement with the Maharastra State Cooperative Bank ltd; to open and operate subsidiary General Ledger account in the name of the Nagpur District Central Cooperative Bank ltd., Nagpur as also with Reserve Bank of India to transact business in Government of India securities, State Development loans and Treasury Bills.

It is further resolved that the decision of investment of sale in securities through S.G.L. Account be taken by the Chairman on the Advice from Funds Management Deptt. of Maharastra State Cooperative Bank Ltd., Mumbai.

It is further resolved that any two of the following officers of the Nagpur District Central Cooperative Bank ltd., be and are hereby authorised to carry out the transactions on behalf of the Bank to place order for Sale/Purchase of investment.

1) General Manager.
2) Manager.
3) Chief Accountant.
4) Chief Officer (Adm.).

Seen

Passed Unanimously

यानंतर मा० अध्यक्ष यांचे परवानगीने झालेल्या चर्चेचा वृतांत खालील प्रमाणे आहे.

चर्चेत भाग घेतांना मा०श्री. विश्वनाथजी निमजे, संचालक म्हणाले की, कर्जवाटपाचे व कर्जवसुलीचे संबधीत तालुक्यातील संचालकाचे सहकार्य घेण्यांत यावे.

मा०श्री- धार्मीक संचालक म्हणाले की, शाखांमधील काम अद्यावत राहणेकारिता शाखा निरीक्षणाची कामे स्थानिक संचालकांकडे

सोपविण्यांत यावी.

मा॰श्री॰पारशिवनीकर, संचालक म्हणाले की, शाखांमधील खाते जुळवणी व समायोजनाची कामे प्रलंबीत आहेत. केवळ ८ शाखांमध्ये खातेबाकी जुळवणीची कामे अद्यावत आहेत. इतर शाखांमध्ये नाहीत. तरी ही खातेबाकी जुळवणीची कामे काम्पुटर लावून अद्यावत करण्यांत यावी.

मा॰श्री. आशिष देशमुख, संचालक म्हणाले की, कर्जवाटप व कर्जवसुली आयोजित सभेला स्थानिक संचालकांना बोलाविण्यांत यावे. मा॰श्री. गावंडे, संचालक यांनी प्रत्येक शाखेत मा॰ संचालकाचे नांवाचे बोर्ड लावण्यांत यावे अशी सुचना केली.

यावर मा॰ सरव्यवस्थापक यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, खाते जुळवणीचे काम व रिकंसीलिएशनची कामे अद्यावत करण्याकरिता संपूर्ण शाखांना सुचना दिलेल्या आहेत. ज्या शाखांना सुचना देऊनही कामे अद्यावत करीत नाहीत, त्यांचे पगार सस्पेन्स जमा करून स्थगित ठेवण्यांत येतात किंवा यासाठी वेळप्रसंगी दंड सुद्धा करण्यात येतो. व रिकंसीलिएशन पत्रक नियमीतपणे सादर करण्यासाठी बाध्य करण्यात येते.

दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि; प्रादेशिक कार्यालय, नागपूरचे उपसरव्यवस्थापक यांनी कर्जवाटप व कर्ज वसुलीचा हंगाम असतांना कर्ज वसुली व कर्जवाटपाचे आढावा संदर्भात सभेपुढे ठेवण्यांत आलेल्या विषय पत्रिकेवर विषय नसल्याचे निदर्शनास आणून दिले.

मा॰ संचालकांनी व प्रतिनिधींनी केलेल्या उपयुक्त सुचनांचा विचार करून योग्य ती कार्यवाही करण्यांत येईल असे सांगून मा॰ जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर, मा॰ उपसरव्यवस्थापक, दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्या, नागपूर. प्रादेशिक कार्यालय, नागपूर. यांनी केलेल्या सुचनांची नोंद करून पुढील सभेत कर्जवसुली व कर्ज वाटप आढाव्या संदर्भात विषय ठेवण्यांत येईल असे मान्य केले.

सभेला उपस्थित असणाऱ्या मा॰ संचालक आणि प्रतिनिधी यांचे आभार मानून मा॰ अध्यक्ष यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

सरव्यवस्थापक

अध्यक्ष

दि नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या, नागपूर

बँकेच्या मा॰ संचालक मंडळाची सभा सोमवार दि॰ २६.७.९९ रोजी दुपारी १२-३० वाजता बँकेचे मुख्य कार्यालयातील "सर माधवराव देशपांडे स्मृती सभागृहात" बँकेचे अध्यक्ष मा॰ श्री॰ सुनिल केदार यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आली.

या सभेला खालील मान्यवर हजर होते.

उपस्थित

१. मा॰ श्री॰ सुनील केदार -- अध्यक्ष
२. मा॰ सौ॰ आशाताई महाजन -- उपाध्यक्षा
३. मा॰ श्री॰ र॰ पां॰ गावंडे -- संचालक
४. मा॰ श्री॰ र॰ गो॰ बंग -- ,,
५. मा॰ श्री॰ भा॰ चं॰ शहाणे -- ,,
६. मा॰ श्री॰ अ॰ रा॰ गुप्ता -- ,,
७. मा॰ श्री॰ व॰ भा॰ वांढे -- ,,
८. मा॰ श्री॰ चं॰ ल॰ कोल्हे -- ,,
९. मा॰ श्री॰ अ॰ र॰ देशमुख -- ,,
१०. मा॰ श्री॰ वि॰ रा॰ हुलके -- ,,
११. मा॰ श्री॰ मा॰ र॰ जामकार -- ,,
१२. मा॰ श्री॰ वि॰ आ॰ राऊत -- ,,
१३. मा॰ श्री॰ वि॰ वि॰ निमजे -- ,,
१४. मा॰ श्री॰ ग॰ के॰ शाहीर -- ,,
१५. मा॰ श्री॰ र॰ व्यं॰ निमजे -- ,,
१६. मा॰ श्री॰ मु॰ भि॰ पन्नासे -- ,,
१७. मा॰ श्री॰ अ॰ शं॰ धार्मिक -- ,,
१८. मा॰ श्री॰ स्मिताताई कुंभारे -- संचालिका
१९. मा॰ सौ॰ कुसुमताई किंमतकर -- ,,
२०. मा॰ श्री॰ व्ही॰ जी॰ शहाणे -- कर्मचारी प्रतिनिधी
२१. मा॰ श्री॰ एल॰ जी॰ चौधरी -- ,,
२२. मा॰ श्री॰ आर॰ एम॰ भुसारी, जिल्हा उपनिबंधक, सह॰ संस्था, नागपूर.
२३. मा॰ श्री॰ एम॰ के॰ श्रेंडे. विशेष लेखा परिक्षक वर्ग १ सह॰ संस्था (बँक), नागपूर
२४. मा॰ श्री॰ ए॰ एन॰ चौधरी -- सरव्यवस्थापक

अनुपस्थित

१. मा॰ श्री॰ अ॰ य॰ गुजर -- संचालक
२. मा॰ श्री॰ स॰ लि॰ चोरे -- ,,
३. मा॰ श्री॰ शा॰ श॰ धवड -- ,,

४. मा. श्री. श्री. नि. निमजे -- संचालक
५. मा. श्री. ब. भा. तायवाडे -- "
६. मा. श्री. व. क. पारशिवनीकर -- "
७. मा. श्री. चं. तु. समर्थ -- "
८. मा. श्रीमती सुमनताई बावनकुळे, अध्यक्षा, जिल्हा परिषद नागपूर.
९. मा. श्री. सुभाषराव धोटे, प्रतिनिधी, महा. राज्य. सह. बँक, म. मुंबई.
१०. मा. सहाय्यक महाप्रबंधक, नाबार्ड, नागपूर.
११. मा. विभागीय अधिकारी, महा. राज्य सह. बँक मर्या. विभागीय कार्यालय, नागपूर.

सुरुवातीला सभेस अनुपस्थित असलेले संचालक मा. श्री. अ. ध. गुजर, मा. श्री. सं. लि. चोरे, मा. श्री. श्री. ग. धवड, मा. श्री. श्री. नि. निमजे, मा. श्री. ब. भा. तायवाडे, मा. श्री. व. क. पारशिवनीकर व मा. श्री. चं. तु. समर्थ यांचे अनुपस्थितीची सभेत नोंद घेण्यात आली व त्यांना अनुपस्थितीची रजा मंजूर करण्यात आली.

सभेला उपस्थित असलेल्या मान्यवरांचे स्वागत करुन माननीय अध्यक्ष यांनी विषयपत्रिकेवरील विषयानुसार सभेच्या कार्यवाहीस सुरुवात केली.

विषय क्रमांक १ – मागील दिनांक १६.५.९९ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त कायम करणे.

ठराव क्रमांक-१ – माननीय अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. मागील सभेचे प्रतिवृत्ता विषयी चर्चेत भाग घेतांना मा. श्री. गु. भि. पन्नासे म्हणाले की, "मागील सभेत ग्रामीण कार्यक्षेत्रातील घरबांधणी व शेतखेती करिता करावयाच्या कर्ज पुरवठ्या संदर्भात मा. संचालक श्री पन्नासे यांचा या कार्यक्षेत्रातील अनुभव लक्षात घेता त्यांचेकडून उपयुक्त अशा सुचना मागविण्यात याव्या" असे मा. अध्यक्ष यांनी सुचले होते." तथापी याबाबत प्रतिवृत्तांत उल्लेख नाही. तसा उल्लेख प्रतिवृत्तात घ्यावा असे मा. अध्यक्ष यांनी सुचविले. तसेच ठराव क्र. ११ बाबत चर्चा करतांना मा. श्री. शाहिर म्हणाले की, हातमाग संस्थाकडील थकित व्याजाचे हप्ते पाडून देतांना कोणतीही अट न टाकतां थकित व्याजाचे हप्ते पाडून हातमाग संस्थांना नुतनीकरणाची सवलत देण्यात यावी व याबाबत पुनर्विचार करावा. यावर मा. अध्यक्ष म्हणाले की, एकाच संस्थेला वेळोवेळी थकित व्याजाचे हप्ते पाडून देऊन नुतनीकरणाची सवलत देणे उचित ठरणार नाही. तसेच अशा संस्थांच्या बचत/चालु ठेव खात्याला रकमा जमा

असतांना प्रथम हप्त्याची रक्कम वसुल करुन घेउन उर्वरित रक्कम संस्थेला परत करणे ही बाब सुध्दा इष्ट ठरणार नाही. त्यामुळे थकित हातमाग संस्थाकडील व्याजाचे हप्ते पाडून देउन नुतनीकरणाची सवलत देतांना पुढील प्रमाणे कार्यवाही करण्यांत यावी.

१. ज्या थकित संस्थांना यापूर्वी थकित व्याजाचे हप्ते पाडून देउन नुतनीकरणाची सवलत दिलेली आहे अशा संस्थांना हप्ते पाडून देण्यांत येणार नाही.

२. ज्या संस्थांकडील व्याजाचे हप्ते पाडून द्यावयाचे आहे. अशा संस्थांकडे ३१ मार्च १९९९ रोजी येणे असलेल्या व्याजाचे समान पंचवार्षिक हप्ते पाडण्यांत यावे. यातून पहिल्या हप्त्याची रक्कम भरणा करुन घेऊनच पतमर्यादेचे नुतनीकरण करण्यांत यावे.

३. वरील २ मध्ये नमुद केल्याप्रमाणे कांही संस्था नगदीने तर कांही संस्था बचत खातोंत जमा असलेल्या रकमेतुन प्रथम हप्ता भरेल. व्याजाच्या प्रथम हप्ता भरणा केल्यानंतरही बचत खातोंत रक्कम शिल्लक असल्यास अशी संपूर्ण रक्कम व्याजाचे पुढील हप्त्यापोटी भरुन घेउन हप्त्यांची संख्या कमी करण्यांत येईल. तसेच यापुढे वेळोवेळी बचत खातोंत जमा होणाऱ्या एम.डी.ए.च्या रकमा व्याजापोटीच वसुल करुन घेण्यांत येईल. संस्थेकडे व्याजाचे हप्ते शिल्लक असतांना एम.डी.ए. रकमांची नगदीने उचल देण्यांत येणार नाही. अशी प्रकरणे स्वतंत्रपणे मा. कर्ज उपसमितीने निकालांत काढावे असे ठरले.

विषयावर सविस्तर चर्चा होउन मागील दिनांक १६.५.१९९९ रोजी झालेल्या सभेचे प्रतिबंध कायम करण्यांत आले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक २ - मागील सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक २ - मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयाचे अनुषंगाने मा. व्यवस्थापक यांनी मागील दिनांक १६.५.९९ रोजीचे सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची सभेला माहिती दिली. सभेत कार्यालयीन कार्यवाहीची नोंद घेण्यांत आली.

—

विषय क्रमांक २ - सन १९९९-2000 करिता महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडून अल्पमुदती शेती पिक कर्ज मर्यादा रुपये १०.०० कोटि मंजूर करण्यात आलेल्या मंजूरी पत्राप्रमाणे नियम व अटी स्विकृत करण्यास मान्यता देऊन दि. २३-७-१९९९ रोजीचे सक्युलर ठरावास मान्यता देणे.

ठराव क्रमांक २ - मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले आणि सभेला माहिती देतांना सांगितले की, सन १९९९-2000 ह्या सालाकरिता महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडून अल्प मुदती शेती पिक कर्ज मर्यादा रुपये १०.०० कोटी पत्र क्रमांक - सीएफए/१/ ओपीआर /एफ-23/६/ ६९९/ एसबीकोन/ नागपूर/१९९९-2000 दिनांक 3-7-९९ नुसार मंजूर झाली असून याबाबत राज्य बँकेने कळविलेल्या नियम व अटींना मान्यता देऊन या कर्ज मर्यादेवर उचल करण्यासाठी दिनांक २३-७-९९ रोजी सक्युलर ठराव करून कर्ज मर्यादेवर उचल करण्यासाठी कार्यवाही केलेली आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन दिनांक २३-७-९९ रोजी खालील प्रमाणे करण्यात आलेला सक्युलर मिटींगचा ठराव कायम करण्यात आला.

— RESOLUTION —

Resolved that the terms and condition laid down by the Maharastra State Co-operative Bank ltd, (Incorporating the Vidarbh Co-operative Bank ltd.,) Mumbai vide Letter No. CFA/OPR/F 23/669/1999-2000, Dated, 3rd July, 1999 for the Credit limit of Rs. 1000.00 Lakhs (Rs. Ten hundreds Lakhs only) sanctioned to this Bank for financing seasonal Agricultural operations under pooled Rate scheme for the year 1999-2000 be and are hereby accepted.

Further, resolved that anyone of the following office bearers from Group 'A' alongwith anyone from officers from Group 'B' are hereby authorised to sign jointly the documents for the drawals of loan from the limit of Rs. 1000-00 lakhs only sanctioned for the short term seasonal Agricultural Credit limit for the year 1999-2000.

Further, resolved that anyone of the office

bearers from Group 'A' Alongwith anyone from the following officer from Group 'B' are hereby authorised to sign jointly the undertaking on behalf of the Nagpur District Central Cooperative Bank ltd., Nagpur creating first charge on the pronotes of the Agricultural credit societies and Act. as custodian of the said pronotes on behalf of the Maharastra State Cooperative Bank ltd. (Incorporating the Vidarbh Cooperative Bank ltd.) Mumbai and to endorse the said pronotes on behalf of this Bank in favour of the Maharastra State Cooperative Bank ltd. (Incorporating the Vidarbh Cooperative Bank ltd.) Mumbai as Collateral security and to sign the monthly certificate of loan on behalf of this Bank.

1. Chairman } Group 'A'
2. Vice chairman }
3. General Manager — Group 'B'

passed Unanimously

---

विषय क्रमांक ८ - बचत ठेव खात्यावरील जास्तित जास्त रु० २.०० लाखाचे वरील बाकीवर व्याज देण्याबाबतचे निर्बंध रद्द करणेस मान्यता देणे.

ठराव क्रमांक ८ - मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. आणि सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेच्या बचत ठेव खात्यावर जास्तीत जास्त रुपये २.०० लाख इतक्या रकमेवर व्याज देण्याबाबतचा नियम आहे. परंतु त्यापेक्षा जास्त रकम असल्यास आणि खातेदाराने विनंती केल्यास व ती बँकेने मान्य केल्यास रुपये २.०० लाखापेक्षा जास्त असलेल्या रकमेवरही व्याज दिले जाईल असाही नियम आहे. अनेक मोठ्या संस्थांच्या बचत ठेव खात्यावर अनेक प्रसंगी व्यवहाराकरिता रु० २.०० लाखापेक्षा जास्त रकम ठेवली जाते. अशा वेळी खातेदारास व्याज मिळण्यासाठी एकतर बँकेकडे विनंती करावी लागते किंवा अशी विनंती न केल्यास व्याजाच्या रकमेस मुकावे लागते. त्यामुळे बचत ठेव खात्यात रु० २.०० लाखापेक्षा जास्त ठेव ठेवण्याच्या

प्रवृत्तीत वाढ होण्याचे दृष्टीने पर्यायाने बँकेच्या ठेवी वाढण्याचे दृष्टीने चालू ठेव खात्यावरील जास्तीत जास्त रुपये ५.०० लाखाचे वरील बाकीवर व्याज देण्याबाबतचे निर्बंध रद्द करण्यात यावे असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ५ - बँकेचे सन १९९८-९९चे नफातोटा पत्रक व दिनांक ३१-३-१९९९ रोजीचे ताळेबंद पत्रक मंजूर करणे.

ठराव क्रमांक ५ - मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला १९९८-९९ या आर्थिक वर्षातील नफा-तोटा पत्रकाची व दिनांक ३१-३-१९९९ रोजीचे ताळेबंद पत्रकाची सभेला माहिती दिली. विषयावर चर्चा करतांना श्री पवारे संचालक म्हणाले की, संशयित व बुडीत कर्जाची तरतुद एकाच वर्षी न करतां आवश्यकते प्रमाणे दरवर्षी करावयास पाहिजे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन सन १९९८-९९ च्या आर्थिक वर्षाचे नफा-तोटा पत्रक व ३१ मार्च १९९९चे ताळेबंद पत्रक सर्वानुमते मंजूर करण्यात आले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ६ - सन १९९८-९९ मध्ये झालेल्या नफ्याचे विनियोगास मंजूरी देणे.

ठराव क्रमांक ६ - मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेला सन १९९८-९९ या वर्षात रुपये १०६.७२ लाख निव्वळ नफा झालेला आहे. आणि मागील वर्षीचा शिल्लक नफा रु० ४.९६ लाख गृहीत धरून रुपये १११.६८ लाख नफा विनियोगासाठी शिल्लक आहे. व या नफ्याचा विनियोग करण्यास आमसभेला शिफारस करावयाची आहे.

विषयावरील चर्चेत भाग घेतांना मा० श्री. र. गो. बेग म्हणाले की, कायद्यानुसार टिपणीमध्ये निव्वळ नफ्यातून बँकेच्या कर्मचार्यांना बोनस/सानुग्रह अनुदान देण्याकरिता रुपये ४२.९८ लाखाची तरतुद करण्यात आली आहे. बँकेच्या कर्मचार्याप्रमाणेच बँकेमार्फत होणारे कर्जवाटप व कर्जवसुलीची कामे गटसचिव करीत असतात. त्यामुळे त्यांना बक्षिस देण्याकरिता शिल्लक नफ्यातून रकमेची तरतुद करण्यात यावी. यासाठी बँकेच्या पोटनियमात तरतुद नसल्यास आवश्यक ती पोटनियम दुरुस्ती करण्यात यावी.

यावर मा० अध्यक्ष म्हणाले की, बँकेला झालेल्या नफ्यातून गटसचिवानाही काही मोबदला मिळाला पाहिजे या मताशी मी सहमत आहे. परंतु बँकेच्या पोटनियमांत याबाबत तरतुद नसल्याने गटसचिव बक्षीसाची तरतुद करण्यास पोटनियमांत करण्यास मा० सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, म० रा० पुणे यांची परवानगी घ्यावी लागेल. यासाठी आवश्यक ती दुरुस्ती बँकेच्या पोटनियमांत करण्यास माननीय सहकार आयुक्त यांची परवानगी घेण्यांत यावी असे सभेचे मत पडले.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेला सन १९९८-९९ मध्ये झालेल्या नफ्याचा विनियोग खालीलप्रमाणे करण्यास आमसभेला शिफारस करण्यांत यावी असे ठरले.

- नफ्याचा विनियोग -

| | | |
|---|---|---|
| सन १९९८-९९ मध्ये झालेला नफा | रु. | १,०६,७१,८६९:१० |
| सन १९९७-९८ चा शिल्लक नफा | रु. | ४,९६,२१०:५० |
| विनियोगासाठी उपलब्ध नफा | रु. | १११६८०७९:६० |

या नफ्याचा विनियोग खालीलप्रमाणे करण्यांत यावा.

| | | |
|---|---|---|
| १. रिझर्व फंड (सन १९९८-९९ च्या निव्वळ नफ्यापैकी) | रु. | ३६७०९६७:२३ |
| २. गरण स्थायीकरण फंड (सन १९९८-९९ च्या नफ्यावर १५%) | रु. | १६००७८०:३३ |
| ३. कर्मचाऱ्यांना बोनस / सानुग्रह अनुदान ८.३३% | रु. | ४२९५०००:०० |
| ४. इमारत निधी | रु. | १६०००००:०० |
| ५. शिल्लक नफा - (पुढील वर्षाकरिता अग्रेषित) | रु. | १३३२:०४ |
| | रु. | १११६८०७९:६० |

ठराव सर्वानुमते मंजूर.

**विषय क्रमांक ७** - सन १९९८-९९ करिता तयार करण्यांत आलेल्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.

**ठराव क्रमांक ७** - मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला

माहिती देतांना सांगितले की, कार्यालयाने सन १९९९-२००० करिता अंदाजित उत्पन्न व खर्च निरनिराळ्या शिर्षकाअंतर्गत दर्शवून अंदाजपत्रक सादर केले आहे. मागिल वर्षी वार्षिक साधारण सभेने मंजूर केलेल्या अंदाजपत्रकानुसार विमा खर्च, अवक्षयन, किरकोळ खर्च आणि बोनस/एक्सग्रेसीया यावर खालील प्रमाणे खर्च जादा झालेला आहे.

(रुपये लाखांत)

| अ.क्र. | खर्चाचा तपशिल | सन १९९८-९९ चा अंदाज | १९९८-९९ मधील प्रत्यक्षात खर्च | जादा झालेला खर्च |
|---|---|---|---|---|
| १. | विमा खर्च | १४.०० | १४.४४ | ०.४४ |
| २. | अवक्षयन | १२.०० | १३.२० | १.२० |
| ३. | किरकोळ खर्च | २९.०० | ३०.९० | १.९० |
| ४. | बोनस/एक्सग्रेसीया | २.०० | ४७.९६ | ४५.९६ |

विषयावर चर्चा करतांना मा. श्री. बेग संचालक यांनी सन १९९९-२००० चे अंदाजपत्रकात दर्शविण्यात आलेला संचालकांच्या जनसंपर्क खर्च वगळण्यात यावा आणि कर्मचाऱ्यांच्या मुळ पगारावर दर्शविलेला खर्च रुपये ५०.०० लाख करण्यात यावा अशी दुरुस्ती सुचविली.

विषयाचे अनुषंगाने विषयावर सविस्तर चर्चा होऊन मागिल वार्षिक साधारण सभेने मंजूर केलेल्या सन ९८-९९ चे अंदाजपत्रकातील तरतुदीपेक्षा वरील प्रमाणे जादा झालेल्या खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली. तसेच सन १९९९-२००० चे अंदाजपत्रकात कर्मचाऱ्यांच्या मुळ पगारावरील खर्च रुपये ५०.०० लाख (अक्षरी रुपये ५०.०० लाख) करुन आणि संचालकांच्या जनसंपर्क खर्च वगळून सन १९९९-२००० चे सुधारित अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

सन १९९८-९९ चे अंदाजपत्रकातील जादा झालेला खर्च व सन १९९९-२००० चे अंदाजपत्रक मंजूरीसाठी सन १९९८-९९ चे वार्षिक साधारण सभेत मान्यतेसाठी ठेवण्यात यावे असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ८ - सन १९९८-९९ ची वार्षिक साधारण सभा घेण्यास मुदतवाढ मिळण्यासाठी मा० जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांना विनंती करणे.

ठराव क्रमांक ८ - महाराष्ट्र सहकारी संस्थांचा कायदा ७५ नुसार दरवर्षी वार्षिक साधारण सभा दिनांक १० ऑगस्ट पूर्वी घेणे आवश्यक आहे.

परंतु वार्षिक साधारण सभेची पुर्वतयारी करण्यासाठी लागणारा कालावधी व पावसाळा सुरु असल्याने सभासदांची होणारी गैरसोय इत्यादि बाबी विचारांत घेता ही सभा घेण्यास बँकेला दिनांक १२.११.९९ पर्यंत मुदतवाढ मिळण्यासाठी मा० जील्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांना विनंती करण्यांत यावी असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ९ - सन १९९८-९९ चे अंकेक्षण पूर्तता अहवालास मान्यता देणे.

ठराव क्रमांक ९ - मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयाचे अनुषंगाने सभेला माहिती देतांना सांगितले की, मा० विशेष लेखा परिक्षक वर्ग-१ सहकारी संस्था (बँक), नागपूर यांनी सन १९९८-९९ ह्या वर्षाचे अंकेक्षण पूर्ण करुन अंकेक्षण करुन अहवाल बँकेस सादर केला. या अहवालावरील दोष पूर्तता अहवाल कार्यालयाने तयार केला.

बँकेने तयार केलेला दोष पूर्तता अहवाल मा० अंकेक्षण पूर्तता उपसमितीचे दिनांक ५.८.९९, दिनांक १२.८.९९ व दिनांक २३.८.९९ रोजी झालेल्या सभेत ठेवण्यात आला. मा० अंकेक्षण पूर्तता उपसमितीचे सभेत सुचविलेल्या दुरुस्त्यांची अंकेक्षण पूर्तता अहवालांत नोंद घेऊन पूर्तता अहवाल तयार करण्यांत आला असून आजच्या मा० संचालक मंडळाचे सभेत अंतीम मान्यता व मंजूरीसाठी ठेवण्यात आला आहे. यावर सविस्तर चर्चा करण्यात येऊन सन १९९८-९९ चे अंकेक्षण पूर्तता अहवालास मंजूरी देण्यांत आली. हे अहवाल संबंधितांकडे त्वरित पाठविण्यांत यावे असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक १० - एकात्मिक ग्रामीण विकास योजना (IRDP) अंतर्गत ट्रॅक्टरचे समुह कर्ज वाटपाचे धोरण राबविणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक १० - मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर सविस्तर चर्चा घेऊन हा विषय पुढील सभेत ठेवण्यात यावा असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ११ - बँकेच्या अद्यावत कर्ज वसुली व कर्ज वाटपाबाबत

विषय आणावा घेणे.

<u>ठराव क्रमांक ११</u> - मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, सन १९९९-२००० करिता जिल्हा स्तरावर अग्रणी बँक व नाबार्ड यांचे मार्गदर्शनाखाली एकूण रुपये ८७.२३ कोटीचा नियोजन आराखडा तयार करण्यात आला असून या नियोजनात खरीप व रब्बी पिकांकरिता रुपये ३५.३८ कोटीचा उत्पादन आराखडा तयार करण्यात आला आहे.

सन १९९८-९९ या वर्षात विविध संस्थांच्या १५६१११ सभासदांना रुपये १४६७३.८४ लाखाची कर्जमंजुरी दिली असून प्रत्यक्षात ३१२६८ सभासदांना नगदी रुपात रु. १५३३.३७ लाख व वस्तुरुपात रु. १२०९.२९ लाख असे एकूण रु. २७४२.६६ लाख कर्जवाटप करण्यात आले आहे.

सन १९९९-२००० या वर्षात नागपूर जील्ह्यातील सहकारी संस्थांच्या १७२०८९ सभासदांना खरीप, रब्बी, व ऊस कर्जवाटपासाठी एकूण रु. १९४७८.०७ लाखाचे कर्ज मंजूर करण्यात आले आहे. प्रत्यक्षात १९९६१ सभासदांना नगदी रुपये ११७८.०४ लाख व वस्तु रु. ८०४.६४ लाख असे एकूण रु. १९२२.६६ लाखाचे खरीप पिक कर्जवाटप करण्यात आले आहे.

यावर्षी खरीप व रब्बी हंगामाअखेर पिक कर्जवाटपाचे उद्दिष्ट पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे.

सन १९९८-९९ मध्ये कर्जवसुली प्रभावीपणे करण्याकरिता तयार केलेल्या कृती कार्यक्रमास मा० संचालक मंडळाने दिनांक २१.११.९८ चे सभेत मान्यता दिली. त्याप्रमाणे या कार्यक्रमाअंतर्गत संस्थावार सभासदांच्या कर्जमागणी याद्या कापूस संकलन केंद्र, एकाधिकार, ज्वार खरेदी, साखर कारखाना, कृषि उत्पन्न बाजार समिती, इत्यादि एजन्सीकडे पाठविण्यात आल्या होत्या. त्याप्रमाणे ग्रीनकार्ड सर्व कापूस संकलन केंद्रावर उपलब्ध करुन देण्यात आले होते. त्याचप्रमाणे वसुलीच्या हंगामाच्या कालावधीत कमीत कमी वेळात जास्तीत जास्त कर्जदार थकित सभासदांशी संपर्क साधता यावा याकरिता प्रत्येक तालुक्याला एक जीपगाडी देण्यात आली. या जीपगाडीचा वापर डिसेंबर ९८ पासून १५ जून १९९९ पर्यंत वसुलीच्या कामाकरिता करण्यात आला.

सन १९९८-९९ च्या पिक हंगामात अपुऱ्या व अकाली पावसामुळे जिल्ह्यातील खरीप पिके उदा० धान, ज्वारी, कापूस, सोयाबीन व मिरची या पिकांची परिस्थिती धोक्यात आली. व त्याचा अनिष्ट परिणाम पिक उत्पादनावर झाला. तसेच नैसर्गिक असमतोलामुळे

संख्याचे उत्पादन अगदीच अल्प होते. ऊस पिकाची लागवड साखर कारखान्याचे बंद स्थितीमुळे होऊ शकली नाही. अशाप्रकारे सर्व पिकांची यंदाची एकंदरीत पिक परिस्थिती असमाधानकारक राहिल्याने त्याचा विपरीत परिणाम बँकेच्या वसुलीवर झालेला आहे. वरील बाबीमुळे विशेष वसुली अधिकाऱ्यांना पाहिजे त्या प्रमाणात जप्त्या लावणे शक्य झाले नाही. तथापी थकबाकीदाराचे जीप्स/ट्रॅक्टरर्स इत्यादि वाहने जप्तीची मोहीम तिव्र गतीने कार्यान्वित करुन बँकेची वसुली जास्तीत जास्त वाढविण्यासाठी वसुलीकरिता पोषक असे वातावरण तयार करण्यांत आले. त्यामुळे मागील वर्षापेक्षा या वर्षी वसुली समाधानकारक असल्याचे दिसून येते. १९९७-९८ मध्ये ३० जून अखेर कर्जवसुली ९.४५% होती. याचवर्षी ३०.जून.१९९९ अखेर कर्जवसुली २४.१९% आहे.

जिल्ह्यांतील पिकपरिस्थिती फारशी समाधानकारक नसतांना मागील वर्षाचे म्हणजे ९७-९८ च्या तुलनेत १९९९ या वर्षात जून अखेर वसुलीचे प्रमाणात १४.६४ टक्क्यांनी वाढ झालेली आहे. तसेच व्याजाच्या वसुलीमध्ये सुध्दा वाढ झालेली आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेच्या अद्यावत कर्ज वाटप व कर्जवसुलीचा आढावा घेण्यात आला.

---

विषय क्रमांक १२- बँकेने उत्कृष्ठ काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना प्रोत्साहनपर एक वार्षिक पगारवाढ देणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक १२- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले आणि सभेला माहिती देतांना सांगितले की, जिल्ह्यातील सेवा/विविध कार्यकारी संस्थांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना शेती विकासाकरिता वेळेवर कर्ज-पुरवठा करणे, तसेच दिलेल्या कर्जाची मुदतीच्या आंत वसुली करुन बँकेची तसेच सहकारी संस्थांची आर्थिक स्थिती मजबूत करुन ग्रामिण विकास घडवून आणणे हा बँकेचा महत्वाचा उद्देश आहे.

सदर उद्देशाचे पूर्ततेकरिता ग्रामिण स्तरावर बँकेच्या सर्व शाखांमधून बँकेचा प्रतिनिधी म्हणून बँक निरिक्षक या पदाचा अधिकारी काम पाहत असतो. बँकेतर्फे दिलेल्या कर्जाची वेळेवर व जास्तीत जास्त वसुली करुन बँक कर्ज व्यवहारातील पैसा मोकळा करुन परत कर्ज व्यवहारात गुंतविणे हे यशस्वी चक्र पूर्ण करण्याची जबाबदारी बँक निरिक्षक पार पाडीत असतो.

बँकेत काम करणाऱ्या या महत्वाच्या घटकाचे मुल्यमापन करुन उत्कृष्ठ कामगिरी करणाऱ्या निरीक्षकास उत्तेजनार्थ बक्षीस, पगारवाढ देण्यांतयावे असा विचार समोर आला आहे. ज्या निरिक्षकांनी त्यांचे कार्यक्षेत्रांत चालू कर्जाची आवत्ति जास्त वसुली करुन थकित कर्जाचे प्रमाण कमी केले आहे. अशा प्रथम क्रमवारीच्या तीन निरिक्षकांना प्रोत्साहनपर वेतनवाढ देण्याबाबत निर्णय घ्यायचा आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन पहिले क्रमांकाचे तीन निरिक्षकांना त्यांचे कामकाज व वर्तणूक पाहून प्रोत्साहनपर वेतन वाढ बक्षीस म्हणून देण्यांत यावी. याबाबतचे अधिकार मा० अध्यक्ष यांना देण्यांत येत आहे. असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

ठराव क्रमांक ९३- शासन निर्मित पदावरिल वसुली अधिकारी श्री डी० बी० पोफळी यांना मुदतवाढ मिळणेबाबत मा० विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांना विनंती करणे.

ठराव क्रमांक ९३- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व विषयाचे अनुषंगाने सभेला माहिती देतांना सांगितले की, श्री डी० बी० पोफळी, विशेष वसुली अधिकारी, तालुका नागपूर येथे वसुली अधिकारी म्हणून शासन निर्मित पदावर सध्या कार्यरत असून त्यांच्या सेवेची मुदत दिनांक ३०-६-१९९९ ला संपुष्टांत आलेली आहे.

श्री. डी० बी० पोफळी ह्यांनी त्यांची सेवानिवृत्तीची तारिख ३०.९.९९ असल्याचे मुख्य कार्यालयास कळविले आहे. श्री पोफळी यांचे आजपर्यंतचे कामकाजाचा आढावा घेतला असतां त्यांचे कामकाज समाधानकारक आहे. संस्थेकडून ३०-६-९९ नंतर नागपूर तालुक्यातील आर.आर०सी० प्रकरणांत नोटींग, केसेस फाईल करणे व या संस्थांच्या रेकार्ड पूर्ण करणे, रोड ट्रान्सपोर्ट अंतर्गत वसुलीची कामे व गैरशेतकी संस्थांचे बँकेला अवार्ड मिळालेल्या प्रकरणांमध्ये वसुलीची कारवाई करण्याची कामे इत्यादि करुन घेणेकरिता त्यांचे सेवेची बँकेला आवश्यकता आहे. त्यामुळे श्री डी० बी० पोफळी यांना शासन निर्मित पदावर नागपूर तालुक्याचे वसुली अधिकारी म्हणून दि०३०.९.९९ पर्यंत मुदतवाढ मिळणेकरिता मा० विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, नागपूर यांना विनंती करण्यांत यावी असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक १४ - बँकेच्या अधिकाऱ्यांना सन १९९९-२००० सालकरिता महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० चे कलम १५६ अंतर्गत वसुलीचे अधिकार मिळणेबाबत मा० जील्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांना विनंती करणे.

ठराव क्रमांक १४ - मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व विषयाचे अनुषंगाने सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेच्या थकित कर्जाची वसुली करण्याकरिता मा० जील्हा उपनिबंधक, सह० संस्था, नागपूर यांचे दिनांक १६ ऑक्टोबर १९९८ चे पत्रानुसार वसुली दाखल्याची अंमलबजावणी करण्याकरिता बँकेच्या अधिकाऱ्यांना प्रदान केलेल्या अधिकाराची मुदत दिनांक ३०.६.९९ ला संपलेली आहे.

थकित कर्जाची वसुली करण्याकरिता खाली दर्शविलेल्या बँकेचे अधिकारी व विशेष वसुली अधिकारी यांना दि. ३०.६.९९ नंतर पुढील एक वर्षाकरिता म्हणजे दिनांक ३०.६.२००० पर्यंत वाढवून मिळण्यासाठी मा० जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांना विनंती करावी लागेल.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नांव | हुद्दा | मुख्यालय | कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. सी. एन. डोईफोडे | मुख्याधिकारी (वसुली) मुख्य कार्यालय नागपूर | नागपूर | नागपूर जील्हा |
| २. | " एस. ए. हुणे | "अ" वर्ग अधिकारी (वसुली) | नागपूर | " |
| ३. | " एस. आर. धनरे | "अ" वर्ग " | हिंगणा तालुका | " |
| ४ | " सी. एम. लोहकरे | "ब" वर्ग " | गुमगांव | " |
| ५. | " एन. ए. देशमुख | "अ" वर्ग " | कळमेश्वर | " |
| ६. | " ए. जी. चरडे | "ब" वर्ग " | धापेवाडा | " |
| ७. | " एस. एम. शेरकी | "ब" वर्ग " | कामठी | " |
| ८ | " सी. एन. काकडे | 'ब' वर्ग " | " | " |
| ९. | " एन. जी. गायकवाड | 'अ' वर्ग " | नरखेड | " |
| १०. | " एस. आर. बरोकर | 'ब' वर्ग " | नरखेड | " |
| ११. | " टी. एन. काळबांधे | 'ब' वर्ग " | सावनेर | " |
| १२. | " पी. बी. राठोड | 'अ' वर्ग " | पारशिवनी | " |
| १३. | " आर. डी. पाटील | 'अ' वर्ग " | कुही | " |
| १४ | " व्ही. एस. सातफळे | 'ब' वर्ग " | कुही | " |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १५. | श्री. एस. आर. वरुडकर | ब वर्ग अधिकारी | कामठी | नागपूर जील्हा. |
| १६. | " पी. एन. घोडे | ब वर्ग अधिकारी | मौदा | " |
| १७. | " एस. एस. देशभ्रतार | ब वर्ग अधिकारी | मौदा (खात अरोली) | " |
| १८. | " पी. एन. उल्लेवार | ब वर्ग अधिकारी | मौदा (मौदा, मारोडी) | " |
| १९. | " आर. डी. भ्रोयर | अ वर्ग अधिकारी | रामटेक | " |
| २०. | " यु. जे. पूरी | ब वर्ग अधिकारी | उमरेड | " |
| २१. | " एम. आय. मडावी | अ वर्ग अधिकारी | भिवापूर | " |
| २२. | " एम. एम. मानकर | ब वर्ग अधिकारी | नागपूर (गणेशपेठ) | " |

. विषयावर चर्चा होऊन वरीलप्रमाणे बँकेचे अधिकारी व विशेष वसुली अधिकारी यांना दिनांक १.७.१९९९ पासून दिनांक ३०.६.२००० पर्यंत एक वर्षा करिता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६(१) आणि (२) महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६० चे कलम-२(एच) व (जे) तसेच नियम १०७ खालील उपनियम (३),(५),(६),(७),(९),(१०),(११) (अपसेट प्राईस कायम करण्याची तरतुद वगळून) (१२), (१३), (१५),(१६) व (२०) तसेच कलम १०१ व कलम १३७ नुसार देण्यात्रिलेल्या वसुली दाखल्याची अंमलबजावणी करण्या साठी अधिकार देणेबाबत मा० जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांना विनंती करण्यात यावी. असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक १५ - मा. अध्यक्ष यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

विषय क्रमांक १५(१) - नागपूर जिल्हा शेतकरी सहकारी सुतगिरणी, हिंगणा यांना मशिनरी खरेदीकरिता महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. मुंबई येथे आय.एल.सी. ची सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत...

ठराव क्रमांक १५(१) - विषयाचे अनुषंगाने मा. अध्यक्ष यांनी सभेला माहिती दिली. त्यानुसार नागपूर जिल्हा शेतकरी सहकारी सुतगिरणी, हिंगणा यांना सुतगिरणीचे आधुनिकीकरणा करिता जर्मनीचे "स्लाफोर्ड ए. जी. अँड कंपनी कडून "आटोकोनर" ही अद्यावत मशिनरी खरेदी करावयाची असून त्यासाठी संस्थेने या कंपनीशी करार केला आहे. सदर मशिनरीची जर्मन विदेशी चलनात (एकूण) किंमत रुपये ३६९५००/- डेम म्हणजेच भारतीय चलनानुसार सरासरी रुपये ८६०० लाख असून ही रक्कम कंपनीला विदेशी चलनात अदा करावयाची आहे त्यासाठी संस्थेने

आपल्या बँकेमार्फत महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्या., मुंबई येथे रुपये १२.०० लाखाची इनलँड लेटर ऑफ क्रेडीट (आय.एल.सी.) सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत विनंती केलेली आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्या., मुंबई येथील आय.बी.डी. विभागाशी झालेल्या चर्चेप्रमाणे व त्यांनी पुरविलेल्या माहितीप्रमाणे मशीनरी खरेदीचे किंमती इतक्या रकमेची म्हणजे रुपये ८४.०० लाखाचे एल.सी. खाते गिरणीच्या नांवाने उघडावे लागेल. याकरिता जिल्हा बँकेला ११०% (एक्के) इतकी म्हणजेच रुपये ९२.०० लाखाची गॅरंटी द्यावी लागेल. या गॅरंटीपोटी आपल्याला राज्य बँकेला रुपये १.०० कोटी रकमेची मुदत ठेव पावती क्केन करून द्यावी लागणार आहे. तसेच मशिनरी पेमेंटचे वेळी आपल्या मुंबई येथील चालु खात्यातून रक्कम उपलब्ध करून द्यावी लागेल. तथापी आपल्या चालु खात्याला बाकी नसल्यास सदरची मुदत ठेव पावती मुदतपूर्व वटविण्यासाठी सुध्दा अधिकार द्यावे लागतील.

संस्थेने सदर मशीनरीचे खरेदीकरिता मध्यम मुदती कर्ज मिळण्या बाबत आपल्या बँकेकडे कर्ज मागणी अर्ज सादर केला आहे. तथापी संस्थेची निकड व कंपनीकडून मिळालेली मर्यादित मुदत विचारात घेता संस्थेला लवकरात लवकर महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, मुंबई मध्ये आय.एल.सी. सुविधा उपलब्ध करून द्यावी लागेल व याकरिता गिरणीला मंजूर असलेल्या तारणगहाण मर्यादेवर रुपये ९२.०० लाख रक्कम "इअरमार्क" करून ठेवावी लागेल.

संस्थेला चालु वर्षाकरिता प्लेज कर्ज मर्यादा रुपये ६००.०० लाख दिनांक ३१.३.२००० पर्यंतचे कालावधीकरिता मंजूर झाली असून, यावर आज कर्जबाकी शुन्य आहे. सर्व चार्जेससह मशिनरी खरेदीपोटी लागणारी एकूण रक्कम सुतगिरणीच्या तारणगहाण खात्याला किंवा चालु खात्याला नांवे टाकून वसूल करून घेण्याबाबत संस्थेने त्यांच्या दिनांक १६.८.१९९९ च्या संचालक मंडळाचे सभेतील ठरावान्वये अधिकार दिलेले आहेत.

यावर सभेत सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, नागपूर जिल्हा शेतकरी सहकारी सुतगिरणी मर्या., हिंगणा यांना जिल्हा बँकेने महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्या., मुंबई येथे आय.एल.सी. सुविधा उपलब्ध करून देण्याकरिता हमी देण्यांत यावी. तसेच सुतगिरणीची निकड लक्षात घेता गिरणीला मंजूर असलेल्या तारणगहाण मर्यादेतून रु.९२.०० लाख तात्पुरती उचल मर्यादा गोठवून ठेवावी व सुतगिरणीची गरज भागवावी. तसेच सदर सुविधेकरिता राज्य सहकारी बँकेला

आवश्यक असल्यानुसार खालीलप्रमाणे ठराव घेण्यांत यावा.

Resolved that –

1.) At the request of Nagpur Zilla Shetakari Sahakari Soot Girni Ltd., Hingna a joint and several guaranty be issued in favour of The MSC Bank Ltd., Mumbai, against the documentary credit to be issued by the letter for the rupee equivalent of 361500 DEM (in words Three Lakhs Sixty one thousand five hundred DEM) at the rate of exchange applicable for retirement of Bills there under.

2.) The fixed Deposit Receipt No. 88/64 for Rs. 10000000/- issued by M. S. Coop. BANK Ltd., R.O. Nagpur be discharged in favour of the M.S.C Bank Ltd., Mumbai. It is authorised in case of need, to utilise the proceeds. Prematurely, if need be, to retire documents under the credit.

The M.S.C Bank ltd., is also authorised to renew the FDR with maturity coinciding with retirement of the bills under the credit.

3.) The M.S.C. Bank ltd., Mumbai is authorised to debit Current Account No. 96/5751 with themselves by Rupee equivalent of the bill amount, charges and interest if any. incurred under the documentary credit.

4.) Any of the two of the following persons are authorised to sign guaranty, counter guaranty, status report on applicant and instructions for issue of the documentary credit.

| Sr. No. | Name | Designation. |
|---|---|---|
| (1) | Shri B.C. Shahane | Director. |
| (2) | Shri R.V. Nimje | Director. |
| (3) | Shri A.N. Chaudhary | General Manager. |
| (4) | Shri S.S. Gode | Manager (Officiating) |

5.) Any one of the following persons is authorised to countersign documents issued by the applicant for the credit.

| Sr No. | Name | Designation. |
| --- | --- | --- |
| 1 | Shri A. N. Chaudhary | General Manager. |
| 2. | Shri S. S. Gode | Manager (Officiating) |
| 3. | Shri A. B. Deshmukh. | Chief officer (Loan) |

passed unanimously.

यानंतर सभेपुढे कोणतेच विषय नसल्याने उपस्थितांचे आभार मानुन मा० अध्यक्ष यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

सरव्यवस्थापक — अध्यक्ष

दि नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, नागपूर

बँकेच्या मा० संचालक मंडळाची सभा शनिवार दि.१८.९.१९९९ रोजी दुपारी १२.०० वाजता बँकेचे मुख्य कार्यालयातील सर माधवराव देशपांडे स्मृती सभागृहांत बँकेचे अध्यक्ष मा.श्री. सुनिल केदार यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आली.

या सभेला खालिल मान्यवर उपस्थित होते.

- उपस्थित -

१. मा. श्री. सुनिल केदार — अध्यक्ष
२. मा० सौ० आशाताई महाजन — उपाध्यक्षा
३. मा. श्री. र. पां. गावंडे — संचालक
४. मा. श्री. र. गो. बंग — ,,
५. मा० श्री. श्रा. चं. शहाणे — ,,
६. मा. श्री. अ. रा. गुप्ता — ,,
७. मा. श्री. व. श्रा. वांढे — ,,
८. मा. श्री. अ. य. गुजर — ,,
९. मा. श्री. चं. ल. कोल्हे — ,,
१०. मा. श्री. आ. र. देशमुख — ,,
११. मा. श्री. सं. लि. चोरे — ,,
१२. मा. श्री. शा. ग. धवड — ,,
१३. मा. श्री. वि. रा. हुलके — ,,
१४. मा. श्री. वि. वि. निमजे — ,,
१५. मा. श्री. ग. के. शाहिर — ,,
१६. मा. श्री. श्री. नी. निमजे — ,,
१७. मा. श्री. र. व्यं. निमजे — ,,
१८. मा. श्री. ब. भा. तायवाडे — ,,
१९. मा. श्री. मु. भि. पन्नासे — ,,
२०. मा. श्री. अ. शं. धार्मिक — ,,
२१. मा. श्री. घ. क. पारशिवनीकर — ,,
२२. मा. श्री. चं. तु. समर्थ — ,,
२३. मा. सौ. स्मिताताई कुंभारे — संचालीका
२४. मा. सौ. कुसुमताई किंमतकर — ,,
२५. मा. श्री. सुभाषराव धोटे, प्रतिनिधी, म. रा. सह. बँक मर्या. मुंबई.
२६. मा. श्री. एल. डी. चौधरी — कर्मचारी प्रतिनिधी
२७. मा. श्री. व्ही. डी. शहाणे — ,,

२८. मा. श्री. आर. एम. भुसारी, जिल्हा उपनिबंधक, सह. संस्था, नागपूर.
२९. मा. श्री. ए. एन. चौधरी. सरव्यवस्थापक

– अनुपस्थित –

१. मा. श्री. ना. र. जीभकाटे, संचालक
२. मा. श्री. वि. जा. राऊत "
३. मा. श्री अध्यक्ष, जिल्हा परिषद, नागपूर.
४. मा. श्री. विशेष लेखा परिक्षक वर्ग-१, सह. संस्था (बँक), नागपूर.
५. मा. सहाय्यक महाप्रबंधक, नाबार्ड, नागपूर.
६. मा. विभागिय अधिकारी, म. रा. सह. बँक म. विभागिय कार्यालय, नागपूर

सभेचे सुरुवातीस अनुपस्थित असलेले संचालक माननीय श्री. ना. र. जीभकाटे व मा. वि. जा. राऊत यांचे अनुपस्थितीची सभेत नोंद घेण्यांत आली व त्यांना अनुपस्थितीची रजा मंजूर करण्यात आली.

सभेला उपस्थित असलेल्या मान्यवरांचे स्वागत करुन माननीय अध्यक्ष यांनी विषयपत्रिकेवरील विषयानुसार सभेच्या कार्यवाहिस सुरुवात केली.

विषय क्रमांक १ – मागील दिनांक २६.८.९९ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत कायम करणे.

ठराव क्रमांक १ – मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावरील चर्चेत भाग घेतांना मा. श्री. पन्नासे, संचालक म्हणाले की, मागील सभेतील ठराव क्रमांक ६ प्रमाणे बचत फंडात (Reserve Fund) पोटनियमाप्रमाणे निव्वळ नफ्याचे २५% पेक्षा रुपये १०.०० लाख जास्त रक्कम विनियोजीत झाल्याचे दिसत आहे. त्यावर मा. अध्यक्ष म्हणाले की, बचत फंडात रुपये १०.०० लाख जास्त विनियोजीत केले आहे. हे खरे आहे. ही रक्कम गटसचिवांना बक्षीस म्हणून देण्याकरिता ठेवण्यांत आली असून पोटनियमांतील दुरुस्तीस मान्यता मिळाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यांत येईल. यावर संचालक श्री. र. गो. बंग आणि श्री ब. भा. तायवाडे यांनी ही रक्कम बचत फंडात न ठेवतां शिल्लक नफ्यात ठेवण्यांत यावी. अशी दुरुस्ती सुचविली.

९८-९९ चे नफ्याचे विनियोगाची रक्कम रुपये १०.०० लाख बचत फंडातून काढून शिल्लक नफ्यांत दाखवावी म्हणजे बचत फंड रुपये ३६८०९६८०-२३ ऐवजी रुपये २६८०९६८०=२३ आणि शिल्लक नफा

रुपये १३३२.०४ ऐवजी रुपये १०,०१३३२.०४ याप्रमाणे घेण्यांत यावे असे ठरले.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन दिनांक २९.७.९९ रोजीचे सभेतील विषय क्रमांक ६ मधील दुरुस्तीसह प्रतिवृत्त कायम करण्यांत आले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक २ - मागील सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक २ - मा॰ अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयाचे अनुषंगाने मा॰ सरव्यवस्थापक यांनी मागील दिनांक २९.७.९९ रोजीचे सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची सभेला माहिती दिली. सभेत कार्यालयीन कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.

---

विषय क्रमांक ३. बँकेच्या सन १९९८-९९ च्या वार्षिक अहवालास मंजूरी देणे.

ठराव क्रमांक ३ - मा॰ अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व विषयाचे अनुषंगाने सभेला माहिती देतांना सांगीतले की, सन १९९८-९९ या वार्षिक अहवालाचा मसुदा सभेसमोर मान्यतेसाठी ठेवण्यात आला आहे. विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेच्या सन १९९८-९९ च्या वार्षिक अहवालास सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ४. बँकेच्या सन १९९८-९९ च्या वार्षिक साधारण सभेची तारीख ठरविणे.

ठराव क्रमांक ४ - मा॰ अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयाचे अनुषंगाने सभेला माहिती देतांना सांगितले की, मा॰ जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांनी बँकेची वार्षिक साधारण सभा दिनांक १४.११.९९ पर्यंत घेण्यास मुदतवाढ दिलेली आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेची सन १९९८-९९ ची वार्षिक साधारण सभा मंगळवार दिनांक २६.१०.१९९९ रोजी घेण्यांत यावी. असे सर्वानुमते ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ५ - महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडे सन १९९९-२००० करिता रुपये १८.०० कोटीच्या वाढीव अल्पमुदत पिक फेर कर्ज

मर्यादा मागणीकरिता पाठविलेल्या सर्क्युलर ठरावास मंजूरी देणे.

ठराव क्रमांक ५ - मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेनी सन १९९९-२००० या वर्षाकरिता राज्य बँकेकडे रुपये २४.०० कोटी पीक कर्ज मर्यादा मंजुरीकरिता अर्ज केला होता. केलेल्या अर्जावर राज्य बँकेनी रुपये १०.०० कोटी मर्यादा मंजूर केली. यावर बँकेनी उचल केली आहे.

जुलै अखेर बँकेनी रुपये २६.३६ कोटी वाटप केले आहे माहे ऑगस्ट १९९९ अखेर रुपये ५.०० कोटीचे जादा वाटप होईल असा अंदाज घेऊन रुपये १४.०० कोटीने मर्यादा वाढवून देणेकरिता राज्य बँकेस अर्ज पाठविला आहे. याकरिता वाढीव रुपये १४.०० कोटी पीक कर्ज मर्यादा मंजूर करण्यास दि. ६.९.९९ रोजी सर्क्युलर ठराव करुन पाठविण्यांत आला आहे.

दिनांक ८.९.९९ रोजी खालीलप्रमाणे केलेल्या सर्क्युलर ठरावास सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.

सर्क्युलर ठराव.

नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने सन १९९९-२००० मध्ये पीक कर्ज वाटपाकरिता रुपये २४००.०० लाखाची कर्ज मर्यादा मंजूर करण्यास महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडे अर्ज सादर केला होता. या अर्जावर राज्य बँकेने रुपये १०००.०० लाखाची कर्ज मर्यादा मंजूर केली. या मर्यादेवर बँकेने रुपये ८६०.०० लाखाची उचल केली. दि. ३० जुलै १९९९ चे ताळेबंदानुसार रुपये २६३६ लाखाचे पीक कर्ज वाटप झालेले असून ऑगस्ट १९९९ अखेर रुपये ५००.०० लाखापर्यंत जादा वाटप होईल.

शेती कर्जात बँकेचा स्वनिधी रुपये ६५.६७ कोटी गुंतलेला आहे. स्वनिधी गुंतवणूक रुपये ६६.७३ कोटी आवश्यक असून हा निकष बँकेनी पूर्ण केला आहे. त्यामुळे बँकेचा गुंतलेला निधी मोकळा करण्यास रुपये १४.०० कोटी वाढीव पीक कर्ज मर्यादा मंजूर करण्याकरिता राज्य बँकेस विनंती करण्यात यावी.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ६- राज्य सहकारी बँकेने रुपये ६.०० कोटीची वाढीव अल्पमुदत पीक फेर कर्ज मर्यादा मंजूर केली आहे. या पत्रातील अटी व नियम स्विकारुन कर्ज मर्यादेवर उचल करण्याकरिता अधिकार देणे.

ठराव क्रमांक ६ :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, अल्प मुदती पिक कर्ज वाटपापोटी राज्य बँक/नाबार्ड कडून सवलतीच्या व्याज दराचे फेरकर्ज उपलब्ध करून घेणेबाबत राज्य बँकेकडे रूपये २४.०० कोटीचा अर्ज करण्यांत आला होता. राज्य सहकारी बँकेचे पत्र क्र. सीएफए/ओपीआर/एफ-23/६६२/९९-2000 दिनांक ३.८.१९९९ प्रमाणे आपल्या बँकेला रु १०.०० कोटी अल्प मुदत पिक ~~क~~ कर्ज मंजूर करण्यांत आले. व त्यावर उचल सुध्दा घेण्यांत आली. तथापी सवलतीच्या व्याज दराचे अल्प मुदत पिक कर्ज वाढवून मिळावे. म्हणून राज्य बँकेकडे वाढीव रूपये १४.०० कोटी अ.मु. पिक कर्जाची मागणी करण्यात आली. त्यानुसार राज्य सहकारी बँकेचे पत्र क्र. सीएफए/ओपीआर/एफ-23/११३५/१९९९-2000 दिनांक ३०.८.९९ प्रमाणे रूपये ६.०० कोटीची वाढीव पिक कर्ज मर्यादा मंजूर केलेली आहे. पिक कर्जाची वसुली जून २००० पर्यंत ४०% चे वर झाली पाहिजे. अशी विशेष अट राज्य बँकेनी वाढीव कर्ज मर्यादा मंजूर करतांना घातली आहे. या मर्यादेवर उचल करण्याकरिता नियम व अटी मान्य करण्याच्या खालीलप्रमाणे ठराव करायचा आहे. खालीलप्रमाणे ठराव करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.

## RESOLUTION

Resolved that the terms and condition laid down by The Maharastra state Cooperative Bank Ltd, (Incorporating the Vidarbh Cooperative Bank Ltd,) Mumbai Vide Letter No. CFA/OPR/F-23/1135/1999-2000 Dated 30th August-1999 for the additional credit limit of RS. 600.00 Lakhs (Rs. Six hundred Lakhs only) sanctioned to this Bank making a total limit of Rs. 1600.00 Lakhs for financing seasonal Agricultural operations under pooled Rate scheme for the year 1999-2000 be and are hereby accepted. The Bank will ensure S.T. (SAO) recovery above 40% by the end of June 2000.

Further, resolved that anyone of the following office bearers from Group 'A' alongwith anyone from the following officers from Group 'B' are hereby authorised to sign jointly the documents for the drawals of loan from the limit of Rs. 1600.00 Lakhs only, sanctioned for short term

seasonal Agricultural Credit limit for the year-1999-2000.

Further resolved that anyone of the office bearers from Group 'A' alongwith anyone from the following officer from Group 'B' are hereby authorised to sign jointly the undertaking on behalf of the Nagpur District Central Cooperative Bank, Nagpur crediting first charge on the pronotes of the Agricultural Credit societies as custodian of the said pronotes on behalf of the Maharastra state Cooperative Bank Ltd., (Incorporating the Vidarbha Cooperative Bank Ltd.) Mumbai and to endorse the said pronotes on behalf of the Bank in favour of the Maharastra state Cooperative Bank Ltd., (Incorporating the Vidarbha Cooperative Bank Ltd.) Mumbai as collateral security and to sign the monthly certificate of loan on behalf of this Bank.

1) Chairman } Group "A"
2) Vice-chairman } Group "A"
3) General Manager - Group 'B'

passed unanimously

---

विषय क्रमांक ७ - कामठी तालुका खरेदी-विक्री सहकारी संस्था मर्या. कामठी र.नं. ९२९ ही संस्था अवसायनांत गेल्यामुळे संस्थेचे भाग-भांडवल अवसायकाने संस्थेचे बँकेकडे असलेले भाग-भांडवल रु.५९०० /- बँकेने दिलेल्या कर्जात वळती करण्यासाठी दिलेल्या अर्जाप्रमाणे शेअर्सची रक्कम परतफेड दाखवून कर्जात वळती करण्यास मंजूरी देणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ७ - मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले.व सभेला माहिती देतांना सांगितले की, कामठी तालुका खरेदी विक्री सहकारी संघ मर्या. र.नं. ९२९ अवसायनांत गेली असून सदर संस्थेचे अवसायकांनी शेअर्सची रक्कम रुपये ५९००/- परत मिळण्याकरिता अर्ज दिलेला आहे. कामठी तालुका खरेदी विक्री सहकारी संघाकडे बँकेचे रुपये ७००६२.२० कर्ज व व्याज घेणे असल्यामुळे शेअर्सची रक्कम बँक कर्जात वळती करण्यासाठी अवसायकाने संमती दिली आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन कामठी तालुका खरेदी-विक्री सहकारी संघाचे शेअर्स रक्कम कर्जात वळती करण्यास मान्यता देण्यात आली. तथापी संस्थेकडे असलेले कर्जाची परतफेड शेअर्सचे रकमेतून पूर्ण होत नसल्यामुळे संस्थेचे सभासदत्व कायम राहणेकरिता आवश्यक शेअर्सची रक्कम ठेवून उवरित शेअर्सची रक्कम संस्थेचे कर्ज खाती वळती करण्यांत यावी, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ८ - फर्टिलायझर सस्पेन्स रक्कम रुपये ६९४४९.९९ रिझर्व फंडाला वळती करणेबाबत विचार करणे व निर्णय घेणे.

ठराव क्रमांक ८ - मा॰ अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेच्या खालील शाखांमध्ये फर्टिलायझर सस्पेन्स रक्कम सस्पेन्स खाती जमा आहे.

१. मौदा -- रुपये १९६३५.५९
२. रामटेक -- रुपये ३४२६.७९
३. सावनेर -- रुपये ३९५००.००
४. काटोल -- रुपये ४१२.२७
५. नरखेड -- रुपये २७०५.९०
६. कळमेश्वर -- रुपये १६०३.५०
७. मोहपा -- रुपये १७११.९४

एकुण रुपये ६९४४९.९९

वरीलप्रमाणे शाखावार फर्टिलायझर सस्पेन्स खातेत शिल्लक असलेली बाकी फारपूर्वीची म्हणजे १९६८-६९ चे अगोदरची आहे. त्यावेळी कर्ज वाटपाच्या पध्दतीप्रमाणे खताचे परमीट देतांना त्या परमीट एवढ्या रकमेने प्रत्यक्षात कर्ज लावण्यात येत होते. आणि फर्टिलायझर सस्पेन्स खाते जमा करण्यात येत होते. खरेदी-विक्री संघाकडून परमीट व बील प्राप्त झाल्यावर फेरजमाखर्च घेत असे अशी माहिती प्राप्त झाली. परमिटनुसार कांही प्रकरणी उचल न झाल्यामुळे ही रक्कम शिल्लक राहिली असे दिसते. ही रक्कम २८-३० वर्षापूर्वीची असून याबाबतचा नक्की शोध घेणे शक्य नाही. दरवर्षी लेखा परिक्षकाचे अंकेक्षण अहवालांत ही रक्कम रिझर्व फंडाला वळती करण्याबद्दल सूचना देण्यांत येत असते. त्याप्रमाणे फर्टिलायझर सस्पेन्स रक्कम रिझर्व फंडाला वळती करावयाची आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन फर्टिलायझर सस्पेन्स खातेत असलेले रुपये ६९४४९.९९ रिझर्व फंडाला (Reserve

fund) वर्गती करण्यांत यावी असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ९ - वैयक्तिक कर्जपुरवठा योजनेअंतर्गत शेत हवेली व घर बांधणी कर्ज धोरणास मा० संचालकांनी सुचविलेल्या फेरबदलाबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ९ - मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. व सभेला माहिती देतांना सांगितले की, वैयक्तिक कर्जपुरवठ्याअंतर्गत शेत-हवेली व घर बांधणीसाठी कर्ज मंजुरीबाबत मा० संचालक मंडळ सभा दिनांक २०.३.१९९९-चे सभेत कर्ज धोरण मंजूर केले आहे. या सभेचे प्रतिवृत्त कायम करतांना दिनांक १६.४.१९९९-चे सभेत धोरणाबाबत मा० श्री. पन्नासे, संचालक यांचा बांधकाम क्षेत्रांतील अनुभव लक्षात घेता त्यांचेकडून सुचना मागविण्यांत याव्या असे ठरल्यानुसार त्यांचे कडून सुचना मागविण्यांत आल्या आहेत. मा० संचालक श्री. पन्नासे यांनी केलेल्या सुचना सभेसमोर ठेवण्यांत आल्या आहेत.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन मा० श्री. मु.ग्रि. पन्नासे संचालक यांनी केलेल्या सुचनांच्या विचार करुन सर्वसमावेशक कर्ज धोरण तयार करुन मान्यतेसाठी पुढील सभेत ठेवण्यांत यावे असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक १० - बँकेत नोकरीत असलेल्या कर्मचाऱ्यास अपंगत्व आल्यास त्याच्या पाल्यास नोकरीत समाविष्ट करणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक १० - मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. आणि सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यास दुर्दैवाने अंपगत्व आल्यास व तो काम करण्यास असमर्थ असल्यास संबंधित कर्मचाऱ्याने नोकरीचा दिलेला राजीनामा स्विकारुन त्याच्या पाल्याला शैक्षणिक पात्रतेनुसार नोकरीत घेणेबाबत सहानुभूतीपूर्वक विचार करावा अशी बँकेतील कर्मचारी व कर्मचारी युनियनची विनंती केली आहे.

आपले बँकेत याबाबतचे नियम अस्तित्वात नसल्याने इतर जिल्हा बँकाकडून माहिती मागविण्यांत आली. माहिती प्राप्त झालेल्या बँकांनी शासनाचे धोरण पूर्णतः वा अंशतः लागू केलेआहे.

आपल्या बँकेत सेवेत असतांना बँकेच्या कर्मचाऱ्यास अपंगत्व आल्यास नोकरी गेल्यामुळे नोकरी करण्यास असमर्थ असल्यामुळे त्यांचे वारसदारास घेण्याबाबत नियम नाहीत.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन आपल्या बँकेत सेवेत असतांना कर्मचाऱ्यांस अपंगत्व आल्यास व तो कर्मचारी काम करण्यास असमर्थ असल्याने व त्याने दिलेला राजीनामा स्विकारल्यास त्याचे एका वारसानास नोकरीत घेण्यासंबंधी शासनाचे जे नियम आहेत त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे नियम व धोरण ठरविण्यांत यावे असे ठरले.

बँकेचे सेवेत असणाऱ्या कर्मचाऱ्यास -

१. क्षयरोग, कर्करोग इत्यादि गंभीर आजारामुळे सक्षम वैद्यकिय अधिकाऱ्याच्या प्रमाणपत्रानुसार अकाली निवृत्त व्हावे लागल्यास किंवा.

२. मानसिक किंवा शारीरिक विकलांगता आल्याने सक्षम वैद्यकिय अधिकाऱ्याच्या प्रमाणपत्रानुसार पुढील सेवेसाठी अक्षम ठरविल्याने अकाली निवृत्त व्हावे लागल्यास किंवा सेवेतून काढून टाकल्यास किंवा.

3. सेवेत असतांना कर्तव्य बजावतेवेळी अपघाताने अपंग झाल्यास

४. त्याची पत्नी किंवा मुलगा किंवा अविवाहीत मुलगी यांचेपैकी एकास अनुकंपा आधारावर शैक्षणिक पात्रता पाहून सरळ भरतीने नियुक्त करण्यांत येणाऱ्या पदांवर कर्मचारी वरील कारणामुळे सेवानिवृत्त झाल्याचे तारखेपासून संबंधीताने आवश्यक शैक्षणिक अर्हता प्राप्त करुन पांच वर्षाचे आंत अर्ज केल्यास सहानुभूतीचे दृष्टिकोनातून नियुक्ती देण्याबाबत बँक विचार करु शकेल. अशा नियुक्तीकरिता वय व लेखी परिक्षा या अटीचे बंधन राहणार नाही. अशा उमेदवारास प्रत्यक्ष मुलाखतीस योग्य आढळल्यास नियुक्ती देता येईल.

वरील प्रमाणे कर्मचारी नियुक्तीचे नियमांत सुधारणा करणे करीता प्रकरण मंजूरीसाठी मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांचेकडे पाठवून विनंती करण्यांत यावी असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ११ - मा. अध्यक्ष यांचे परवानगीने ऐनवेळी येणारे विषयावर चर्चा करणे.

विषय क्रमांक ११(१) - सैन्यिक सहायता निधीमध्ये आर्मी सेंट्रल वेलफेअर फंडाला कर्मचाऱ्यांतर्फे गोळा करण्यांत आलेला निधी जमा करणेसाठी पाठविणेबाबत.

ठराव क्रमांक ११(१) - मा. अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, कारगिल सीमेवर देशाचे रक्षणाकरिता लढणाऱ्या जवानांसाठी, रक्षण करतांना लढतां लढतां शहिद झालेल्या जवानांच्या परिवारांसाठी मदत करण्याकरिता बँकेचे कर्मचाऱ्यांनी स्वेच्छेने एक दिवसाचे पगाराची रक्कम रुपये १४६०३१.०२ गोळा केली आहे, सदर रक्कम आर्मी सेंट्रल वेलफेयर फंडाला पाठवायची आहे.

सभेत विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेचे कर्मचाऱ्यांनी स्वेच्छेने गोळा केलेली रुपये १४६०३१.०२ रक्कम व सैन्यिक सहायता निधीस रुपये ३.०० लाख पाठविणेकरिता लागणारी उर्वरित रक्कम रुपये १५३९६८.९८ बँकेचे धर्मदाय फंडातून घेण्यांत यावी. व सेक्रेटरी, आर्मी वेलफेयर फंड, न्यु दिल्ली या नावाने रुपये ३.०० लाख पाठविण्यांत यावे. आणि याकरिता बँकेच्या धर्मदाय फंडातून अपेक्षित मान्यतेवर घेण्यांत आलेल्या रकमेस मान्यता मिळणेसाठी महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्या. पुणे यांना विनंती करावी असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ११(२) - कापूस एकाधिकार योजनेकरिता बँकांचा सहभागासाठी राज्य बँकेकडून आलेल्या पत्रानुसार बँकेची रक्कम गुंतविणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ११(२) - मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. व सभेला माहिती देतांना सांगितले की, एकाधिकार कापूस खरेदी योजनेकरिता जिल्हा बँकांच्या सहभागाविषयी सन ९९-२००० मध्ये आपली बँक किती देऊ शकेल याबाबत विचारणा करणारे पत्र क्र. कृ.ऑ.मा./कापूस/कर्ज सहभाग/फा-५०९/२६२२/९९-२००० दि. २८/८/१९९९ राज्य सहकारी बँकेकडून प्राप्त झाले आहे. या योजनेत कर्ज वाटपाकरिता देण्यांत आलेल्या निधीवर राज्य सहकारी बँक १०१/२% दराने व्याज देणार आहे. सहभाग योजने अंतर्गत या निधीचा वापर साधारणत: जानेवारी २००० ते जुलै २००० या कालावधीकरिता राहणार आहे.

मागील वर्षी आपले बँकेने या योजनेकरिता रुपये ३०.०० कोटी राज्य सहकारी बँकेला दिले होते. सन १९९९-२००० करिता या योजनेत रुपये ५०.०० कोटीपर्यंत अतिरिक्त रक्कम गुंतविण्याबाबत निर्णय घ्यायचा आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन खालील प्रमाणे ठराव करण्यात येत आहे.

## - ठराव -

"महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडून प्राप्त झालेल्या पत्र क्र. क्रओमा/कापूस/कर्ज सहभाग/फा-५००/२९२२/९९-२०००, दि. २८/८/९९ नुसार महाराष्ट्र राज्य कापूस उत्पादक पणन महासंघाने महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेला सन १९९९-२००० हंगामातील कापूस खरेदी करण्याकरिता रुपये ८९५.०० कोटी कर्ज मर्यादेची मागणी केली आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने मागील वर्षीप्रमाणेच सहभाग योजने अंतर्गत बँक किती रकमेची गुंतवणूक करू शकेल याची विचारणा केली आहे. त्यानुसार या योजनेत रुपये ५०.०० कोटी सहभाग योजनेअंतर्गत कर्ज देण्यास मान्यता देण्यांत येत आहे. तसेच याकरिता जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आणि लिड बँक म्हणून राज्य सहकारी बँक ह्यांच्यात करावयाच्या करारातील अटीस मान्यता देण्यात येत आहे. या योजने अंतर्गत वेळोवेळी चर्चा करून निर्णय घेणे, दस्तऐवजावर सह्या करणे याकरिता बँकेचे सरव्यवस्थापक अथवा यांचे अनुपस्थितीत बँकेचे प्रभारी व्यवस्थापक यांना अधिकार देण्यात येत आहे."

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ११(३) - महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने पीक कर्जावरील व्याजदरात सुचविलेल्या बदलानुसार आपले बँकेतील व्याजदरांत बदल करण्याबाबत निर्णय घेणे.

ठराव क्रमांक ११(३) - मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे पत्र क्र. एसीएफए/एफईएन/एफ-२६०/७३४/व्याजदर/१९९९-२००० दिनांक १०/७/१९९९ नुसार व्याजदरांत बदल करणे आवश्यक आहे. राज्य बँकेने व्याजदरात केलेला बदल विचारात घेऊन खालील प्रमाणे सुधारित व्याजदर दिनांक १/१०/१९९९ पासून लागू करण्यात यावे असे ठरले.

| अ.क्र | कर्जाचा प्रकार | सुधारीत दर - बँकेने संस्थेकरिता ऊस सोडून इतर पीक | संस्थेने सभासदांना ऊस सोडून इतर पीके | बँकेने संस्थेला केवळ ऊसाचे कर्जावर | संस्थेने सभासदांना केवळ ऊसाचे कर्जावर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ३(अ) | ४(अ) |
| | शेती कर्ज - (अल्पमुदती शेतकी कर्ज) | | | | |
| १. | खरीप, रब्बी, तेलबिया, दाळी, ऊस व बागायती कर्ज. | | | | |
| | अ) रु. २५०००/- पर्यंत | १०.०० | १३.०० | ११.०० | १४.०० |
| | ब) रु. २५०००/- चेवर रु. २०००००/- पर्यंत | १०.०० | १४.०० | ११.०० | १५.०० |
| | क) रु. २०००००/- चे वर. | १०.०० | १५.०० | ११.०० | १५.०० |

| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| २ | मध्यम मुदती शेती, रूपांतर, फेररूपांतर, द्वितिय फेर आंखणी व गणन कर्जे. | | |
| | अ) रुपये २५०००/- पर्यंत | १०.०० | १३.०० |
| | ब) रु.२५०००/-चे वर रु.२०००००/- पर्यंत | १०.०० | १४.०० |
| | क) रु.२०००००/-चे वर | १०.०० | १५.०० |
| ३ | मध्यम मुदती कर्जे — | | |
| | अ) लघु सिंचन : | | |
| | डगवेल, पंपसेट, ऑ.इंजन, पाईपलाईन नविन विहिर विहिर दुरुस्ती, स्प्रिंकलर, ड्रिप, बोअरवेल, ट्युबवेल इ. | | |
| | रु.२५०००/- पर्यंत | ९.००% | १२.५०% |
| | रु.२५०००/- ते रु.२०००००/- पर्यंत | १०.५०% | १३.००% |
| | रु.२०००००/-चे वर | १०.००% | १२.००% |
| | ब) इतर शेती कर्जे कारणाकरिता | | |
| | दुभती जनावरे, मत्स्यव्यवसाय, शेळीमेंढी, बैलजोडी, शेतघर, शेत कुंपण, शेती औजारे इत्यादि. (लघु सिंचन सोडून इतर सर्व शेती कर्जे) | | |
| | रुपये २५०००/- पर्यंत | ९.००% | १२.५०% |
| | रु.२५०००/- ते रु.२०००००/- पर्यंत | ११.००% | १३.५०% |
| | रु.२०००००/-चे वर | १३.००% | १५.००% |
| ४ | मध्यम मुदती | | |
| | एकात्मिक ग्रामीण विकास योजना (आयआरडीपी) गोबर गॅस. | ९.००% | १२.५०% |
| ५. | कृषि यांत्रिकी सुविधा. | | |
| | ट्रॅक्टर, पॉवर टिलर | | |
| | अ) रु.२०००००/-चे आंत | ११.००% | १३.५०% |
| | ब) रु.२०००००/-चे वर | १३.००% | १५.००% |
| ६. | प्रकल्पा अंतर्गत कर्जपुरवठा (नाबार्ड मंजूर योजना) | | |
| | पडीत जमिन, विकास, उपसा जलसिंचन, कुक्कुटपालन, शेळीमेंढी संगोपन, डेअरी प्रकल्प, फळोद्यान, फुलशेती | | |
| | अ) अ) रु.२५०००/- पर्यंत | ११.५०% | १२.५०% |
| | ब) रु.२५०००/- ते रु.२०००००/- पर्यंत | ११.५०% | १४.००% |
| | क) रु.२०००००/-चे वर | १५.५०% | १५.००% |

| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| ७. | मध्यम मुदती भाग खरेदी करण्यासाठीची कर्जे - | १४.००% | १७.००% |
| ८ | उपसरखरेदीकरिता कर्ज योजना (शेतकी सह. संस्थामार्फत) | १३.००% | १५.००% |
| ९. | बिगर शेती संस्थांना आकारावयाचे व्याजदर - | | |

| अ.क्र | संस्थेचा प्रकार | कर्जाचा प्रकार | सुधारीत दर बँकेने संस्थेस आकारावयाचा | संस्थेने सभासदास आकारावयाचा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | अ) ग्राहक औद्योगिक व स्वतंत्र रित्या नमूद न केलेल्या इतर सर्व बिगरशेतकी संस्था. | (अ) क्लीन कॅश क्रेडीट | १७.००% | – |
| | | (ब) नजरगहाण कॅशक्रेडीट | १७.००% | – |
| | | (क) ताबेगहाण कॅशक्रेडीट | १६.५०% | – |
| | | (ड) भांडवली कर्ज (म.मु. व दि.मु.) | १६.००% | – |
| | | (इ) फेरताबेगहाण ब्रिजलोन (तात्पुरते कर्ज) | १७.००% | – |
| | ब) प्रक्रिया व मार्केटींग- | १) रु. २.०० कोटीचे आंतील कर्जे- | | |
| | | (अ) क्लिन कॅश क्रेडीट | १७.००% | – |
| | | (ब) नजरगहाण कॅश क्रेडीट | १६.५०% | – |
| | | (क) ताबेगहान कॅशक्रेडीट | १६.००% | – |
| | | (ड) भांडवली कर्ज (म.मु. व दि.मु.) | १५.००% | – |
| | | (इ) फेरताबेगहाण ब्रिजलोन (तात्पुरते कर्ज) | १६.००% | – |
| | | २) रु. २.०० कोटीचे वरील कर्जे - | | |
| | | (अ) क्लिन कॅश क्रेडीट | १६.५०% | – |
| | | (ब) नजरगहाण कॅश क्रेडीट | १६.००% | – |
| | | (क) ताबेगहाण कॅश क्रेडीट | १५.५०% | – |
| | | (ड) भांडवली कर्ज (म.मु. व दि.मु.) | १५.००% | – |
| | | (ई) फेरताबेगहाण ब्रिज लोन (तात्पुरते कर्ज) | १६.००% | – |
| २ | पगारदार सेवकांच्या सह. पत संस्था. | (अ) क्लिन कॅश क्रेडीट | १७.००% | – |
| | | (ब) मध्यम मुदती (फिक्सलोन) | १६.५०% | – |
| ३. | ब्रिज लोन (अंतरीम सर्व प्रकारचे) | — | १८.००% | – |
| ४ | विणकर सह. संस्था - | (अ) हातमाग कॅशक्रेडीट | १०.५०% | – |
| | | (ब) यंत्रमाग कॅश क्रेडीट | १२.००% | |